




# गोदातीर समाचार

स्थापना-१९६२

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com








* वर्ष ६४ वे * अंक १६३ * नांदेड * गुरूवार, दि. १९ जून २०२५ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211


# इयत्ता पहिलीपासून हिंदी भाषा अनिवार्य करण्याचा निर्णय अखेर मागे

**मुंबई (प्रतिनिधी)–** राज्य सरकारने इयत्ता पहिलीपासूनच त्रिभाषा सूत्र स्वीकारले असून मराठी आणि इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये तिसरी भाषा ही हिंदी अनिवार्य, असा शासन निर्णय केला आहे. राष्ट्रीय शिक्षण धोरणाच्या अंमलबजावणीसोबतच राज्य अभ्यासक्रम आराखडा नव्या शैक्षणिक वर्षापासून लागू करताना मराठी शाळांमध्ये पहिलीपासून हिंदी अनिवार्य करण्याचा निर्णय शासनाने घेतल्यानंतर पालकांनी, राजकीय नेत्यांनी आणि शिक्षक संघटनांनी त्याला तीव्र विरोध केला होता. याविरोधानंतर सरकारने बाजू मांडत शाळांमध्ये इयत्ता पहिलीपासून हिंदी भाषा अनिवार्य करण्याचा निर्णय अखेर मागे घेत असल्याची घोषणा शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी केली होती. आता शालेय शिक्षण व क्रीडा विभागाकडून नवा शासन निर्णय काढण्यात आला आहे.

राज्य अभ्यासक्रम आराखडा शालेय शिक्षण २०२४ नुसार यापुढे इयत्ता पहिली ते पाचवीसाठी मराठी व इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये हिंदी ही तृतीय भाषा म्हणून अनिवार्य असेल. शिवाय अन्य माध्यमांच्या शाळांमध्ये इयत्ता पहिली ते पाचवीसाठी माध्यम भाषा, मराठी व इंग्रजी अशा तीन भाषा अभ्यासल्या जातील. इयत्ता ६वी ते १०वी करिता भाषा धोरण हे राज्य अभ्यासक्रम आराखडा शालेय शिक्षण प्रमाणे असेल. असा भाषाविषयक धोरण या शीर्षकाखालील उपपरिच्छेदामध्ये नमूद करण्यात आले असून शासनाने हा निर्णय जारी केला आहे.


दरम्यान, सर्व माध्यमांच्या शाळांमध्ये मराठी अनिवार्य भाषा असेल. या कार्यवाहीसंबंधीचे सर्व नियोजन हे आयुक्त (शिक्षण), शिक्षण आयुक्तालय, महाराष्ट्र शासन, पुणे यांच्यास्तरावरून तात्काळ करण्यात येईल. मराठी व इंग्रजी माध्यमाच्या शाळांव्यतिरिक्त अन्य माध्यमांच्या शाळांमध्ये इयत्ता पहिली ते पाचवीसाठी माध्यम भाषा, मराठी व इंग्रजी अशा तीन भाषा अभ्यासल्या जातील. इयत्ता ६वी ते १०वी करिता भाषा धोरण हे राज्य अभ्यासक्रम आराखडा शालेय शिक्षण प्रमाणे असेल, असेही सांगण्यात आले आहे.


### महाराष्ट्रात हिंदी सक्ती खपवून घेतली जाणार नाही –राज ठाकरे

महाराष्ट्रात हिंदी भाषा सक्तीची अंमलबजावणी खपवून घेतली जाणार नाही, असा ठाम इशारा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी पुन्हा एकदा दिला आहे. शाळा हिंदी कशा शिकवतात हे आम्ही बघू. जर सरकारला हा विरोध आव्हान वाटत असेल, तर त्यांनी तो आव्हानच समजावा. यासंदर्भात सरकारला दोन पत्रे पाठवून देखील निर्णय मागे घेतला नसल्याने राज ठाकरे आक्रमक झाले आहेत. हिंदी ही राष्ट्रभाषा नाही आणि ती महाराष्ट्रात सक्तीने शिकवण्याचा कोणताही प्रयत्न खपवून घेतला जाणार नाही, असे स्पष्ट करत त्यांनी सरकारच्या निर्णयाला विरोध दर्शवला. त्यांच्या या भूमिकेमुळे राज्यात नव्या राजकीय संघर्षाची शक्यता निर्माण झाली आहे.

# डॉ. सुरेश सावंत यांना बालसाहित्यासाठी साहित्य अकादमीचा पुरस्कार जाहीर

**नांदेड (प्रतिनिधी)–** येथील ज्येष्ठ बालसाहित्यकार डॉ. सुरेश सावंत यांना त्यांच्या बालसाहित्यासाठी साहित्य अकादमीचा पुरस्कार जाहीर झाला आहे. 'आभाळमाया' ह्या बालकवितासंग्रहाची ह्या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. हे पुस्तक पुण्यातील चेतक बुक्स ह्या प्रकाशन संस्थेने प्रकाशित केले आहे.






डॉ. सावंत यांची आजवर ५६ पुस्तके प्रकाशित झाली असून त्यापैकी ३३ पुस्तके बालसाहित्याची आहेत. त्यांना महाराष्ट्र शासनाच्या तीन पुरस्कारांसह अन्य प्रतिष्ठित साहित्यसंस्थांचे ४५ पुरस्कार मिळाले आहेत. शिक्षणक्षेत्रातील अतुलनीय योगदानाबद्दल त्यांना राष्ट्रपती पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. नांदेड जिल्हा परिषदेचा नरहर कुरुंदकर पुरस्कारही त्यांना मिळाला आहे. पुणे येथील अ. भा. मराठी बालकुमार साहित्य संस्थेच्या जीवनगौरव पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात आले आहे. डॉ. सावंत यांचे साहित्य शालेय तसेच विविध विद्यापीठांच्या अभ्यासक्रमांत समाविष्ट झाले आहे. त्यांच्या एकूण बालकवितेवर संशोधन करून एका विद्यार्थ्याने एम. फिल. ही पदवी संपादन केली आहे. अनेक विद्यापीठांत त्यांच्या बालसाहित्यावर संशोधन होत आहे.

डॉ. सुरेश सावंत यांची वाचनसंस्कृती लेखनसंस्कृती, बालसाहित्य आणि बालशिक्षणाचा अनुबंध, आजची मराठी बालकविता आणि बालसाहित्यातील नवे काही ही पुस्तके संदर्भग्रंथ म्हणून अभ्यासकांसाठी अतिशय उपयुक्त ठरली आहेत. डॉ. सावंत यांनी कुंटूर, जळगाव आणि पैठण येथे संपन्न झालेल्या बालकुमार साहित्य संमेलनांचे अध्यक्षपद भूषविले आहे. डॉ. सावंत यांनी १२१ पुस्तकांना प्रस्तावना लिहिल्या आहेत किंवा पाठराखण केली आहे. अलीकडेच शालेय विद्यार्थ्यांनी लिहिलेले आणि संतोष तळेगावे यांनी संपादित केलेले 'रानफुलं फुलवणारे बालकवी डॉ. सुरेश सावंत' हे पुस्तक प्रकाशित झाले आहे.

दोन प्रकारातले पुरस्कार सरकारने जाहीर केले आहेत. यात साहित्य अकादमी युवा पुरस्कार २०२५ आणि बाल साहित्य पुरस्कार २०२५ची घोषणा करण्यात आलेली आहे. युवा साहित्य पुरस्कारांमध्ये २३ साहित्यिकांचा समवेश आहे. यामध्ये देशातल्या विविध भाषांचा समावेश आहे. मराठीत लेखक प्रदीप कोकरे यांच्या खोल खोल दुष्काळी डोळे या कादंबरीला साहित्य अकादमी युवा पुरस्कार २०२५ जाहीर झाला आहे. कोकणी भाषेमध्ये गावगाथा या ग्लिनिस डायस यांच्या कथेला पुरस्कार जाहीर झाला. तर साहित्य अकादमी बाल साहित्य पुरस्कार २०२५ या सन्मानासाठी मराठीतल्या 'आभाळमाया' या कवितासंग्रहाला साहित्य अकमादमी पुरस्कार जाहीर झाला. सुरेश सावंत यांचा हा कवितासंग्रह आहे.

# पुण्यात स्विफ्ट कारचा भीषण अपघात, ७ जण जागीच ठार, ५ गंभीर जखमी

**पुणे (प्रतिनिधी)–** जिल्ह्यातील जेजुरी-मोरगाव रस्त्यावर स्विफ्ट कार आणि पीकअप टेम्पोच्या भीषण अपघाताची घटना घडली. या दुर्दैवी अपघातात एका महिलेसह ७ जणांचा जागीच मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती आहे. जेजुरी मोरगाव रस्त्यावरील एका कंपनी समोर रात्री सव्वा ७ वाजण्याच्या सुमारास हा अपघात झाला. अपघाताच्या घटनेनंतर स्थानिकांनी घटनास्थळी धाव घेतली असून पोलिसांनाही पाचारण करण्यात आलं आहे. दरम्यान, अपघात एवढा भीषण होता की ७ जण ठार झाले असून ५ जण गंभीर जखमी झाल्याची माहिती आहे. जखमींना जवळील रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आलं आहे.

याबाबत घटना स्थळावरुन मिळालेली माहिती अशी की, पुण्याहून मोरगावकडे जाणारी स्विफ्ट डिझायर कार (क्र. एम.एच. ४२. ए.एक्स.१०६०) जेजुरीकडून मोरगावकडे जात असताना श्रीराम ढाब्यासमोर पिकअप टेम्पोला (क्र. एम. एच. १२. एक्स.एम. ३६९४) मधील साहित्य खाली करीत असताना जोरदार धडक दिली. येथील रस्त्यावरील एका कंपनी समोरील हॉटेल श्रीराममध्ये पीकअप टेम्पोमधील साहित्य उतरविण्याचे काम सुरू होते. त्यावेळी जेजुरीकडून इंदापूरकडे जाणाऱ्या कारने पीकअप टेम्पोला जोरदार धडक दिली. या अपघातात स्विफ्ट कारमधील पाच जण तर पिकअपमध्ये असलेल्या दोन जणांचा जागीच मृत्यू झाला. त्यावरुन, अपघाताची दाहकता लक्षात येईल.

# किनवटमध्ये गुप्तधन मिळाल्याच्या चर्चेने खळबळ; चौकशीसाठी तिघे ताब्यात

**किनवट (प्रतिनिधी)–** शहराच्या सुभाषनगरातील एका घरात गुप्तधन मिळाल्याच्या चर्चेने बुधवारी शहरभर खळबळ माजली. याप्रकरणी पोलिसांनी घरमालकासह इतर दोघांना चौकशीसाठी ताब्यात घेतले आहे.

किनवटच्या सुभाषनगरातील एका घरात मोठ्या प्रमाणावर गुप्तधन सापडल्याची माहिती तेथील रहिवाशांनी बुधवारी सायंकाळी किनवट पोलिसांना दिली. पोलिसांनी सदर घर गाठून पाहणी व चौकशी केली. 'त्या' घरात गेल्या ३ दिवसांपासून रात्रंदिवस खोदकाम सुरू आहे. गुप्तधनाला बळी देण्यासाठी १ बोकूडही आणून ठेवले आहे. तीन दिवसांपासून घरात अंगारे, धुपारे सुरू आहेत, असे तेथील रहिवाशांनी सांगत त्या घरात गुप्तधन निघालेच असल्याचा दावा केला आहे. याबाबत त्या घरच्या मंडळींना विचारणा केली असता गुप्तधन मिळाले, ही रहिवाशांनी पसरवलेली अफवा आहे, आम्ही घराच्या दुरुस्तीसाठीच खड्डे खोदल्याचे त्यांच्याकडून सांगण्यात आले. दरम्यान गुप्तधन मिळाल्याच्या चर्चेनंतर त्या घराजवळ रात्री उशिरापर्यंत मोठी गर्दी होती. चौकशीसाठी तिघांना ताब्यात घेतले आहे, यातून काय निष्पन्न होईल, हे पाहावे लागेल, अशी माहिती पोलीस निरीक्षक देवीदास चोपडे यांनी दिली.

# एसटी महामंडळाकडून उत्पन्न वाढीसाठी रस्त्यावर धावणार खासगी बसेस

**मुंबई (प्रतिनिधी)–** राज्य सरकारने एसटी महामंडळाच्या उत्पन्न वाढीसाठी महत्वपूर्ण बदल करण्याचा निर्णय घेतला आहे, ज्यामुळे एसटी महामंडळाला फायदा होऊ शकतो. जास्त उत्पन्न देणाऱ्या मार्गावर खासगी बसेस चालवण्याचे नियोजन राज्य सरकार तर्फे करण्यात आले आहे. खासगी बससेच्या व्होल्वो कंपनीला एसटीचा लोगो, तिकिट सेवा आणि एसटी थांबे प्रदान करण्यात येणार आहेत, त्यामुळे खाजगी बस कंपनीला फायदा होणार असून, त्यातील १४ टक्के हिस्सा राज्य सरकारला देण्यात येणार आहे. एसटी महामंडळाच्या ताफ्यात ३० शयनयान, आणि ७० आसनी, अशा १०० व्होल्वो बस दाखल होणार आहेत.



एसटीची आर्थिक स्थिती सुधरण्यासाठी प्रतिदिन ३४ कोटी अपेक्षित असून सद्यस्थिती एसटी महामंडळाला ३० कोटी उत्पन्न मिळत आहे. या वर्षी मोठ्या प्रमाणात लग्नसमारंभ असूनही एसटीला जास्त प्रमाणात नफा झाला नाही. भाडेवाढ होऊनही एसटीची तिजोरी रिक्त आहे. प्रवाशांनी देखील एसटीकडे पाठ फिरवली असल्याने एसटी उत्पन्न वाढीसाठी प्रयत्न सुरु आहेत. एसटी ज्या मार्गांवरुन धावणार आहे त्या मार्गांवरती प्रवाशांसाठी सुख सोयी उभारण्याकरता व्होल्वो खासगी कंपनीतर्फे नियोजन करण्यात येणार आहे.

# अरण्यऋषी मारुती चितमपल्ली यांचे निधन

**मुंबई (प्रतिनिधी)–** पद्मश्री पुरस्काराने सन्मानित अरण्यऋषी मारुती चितमपल्ली यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. वयाच्या ९३ वर्षी अरण्यऋषी मारुती चितमपल्ली यांनी अखेरचा श्वास घेतला. ३० एप्रिल २०२५ रोजी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते त्यांना पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते. या पुरस्कार सोहळ्यानंतर दिल्लीतून परतल्यापासूनच त्यांची प्रकृती चिंताजनक होती. ते आजारी आणि अंथरुणातचं होते. अखेर, बुधवारी संध्याकाळी ७ च्या सुमारास सोलापुरातील राहत्या घरी त्यांचे निधन झाले.



मारुती चितमपल्ली यांनी वन खात्यात ३६ वर्ष सेवा केली. त्या काळात देशभर संशोधकवृत्तीने भटकंती केली. त्यांनी एकूण ५ लाख किमी प्रवास केला. मारुती चितमपल्ली यांना १३ भाषांचे ज्ञान होते. त्याद्वारे आदिवासी व इतर जमातींशी संवाद साधत त्यांनी पर्यावरणाशी संबंधित मोठी माहिती मिळवली. त्या माहितीची नोंद केलेल्या आणि ३० वर्षे जपून ठेवलेल्या शेकडो डायऱ्या आहेत. डायरीतील नोंदीला शास्त्रीय आधार देत पक्षीकोश, प्राणीकोश आणि मत्स्यकोशाचे लेखन पूर्ण केलं.

# लॉकअपमधील आरोपीचे व्हिडीओ कॉलवर बोलणे करून दिल्यामुळे पोलीस अंमलदाराचे निलंबन; एसपी अबिनाश कुमार यांचा आदेश

**नांदेड (प्रतिनिधी)–** एका गंभीर गुन्ह्यात वजिराबादमध्ये असलेल्या आरोपीला व्हिडिओ कॉलवरून कुख्यात गुंड असलेल्या आरोपीशी बोलणे करून दिलेल्या एका पोलीस अंमलदाराला पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी निलंबित केले आहे.

दि. २५ फेब्रुवारी २०२५ रोजी नांदेड ग्रामीण ठाण्यात अनेक गंभीर गुन्ह्यातील सहा आरोपींना अटक करण्यात आली असून गुन्ह्यातील दोन आरोपी फरार आहेत.

सदर गुन्ह्यातील १ आरोपी सध्या वजिराबाद येथील लॉकअपमध्ये पोलीस कस्टडी रिमांडमध्ये अटक आहे. वजिराबाद येथील लॉकअपवरती आरोपी गार्ड नेमलेला असून सदर गार्डमध्ये पोलीस अंमलदार पोकॉ/२८२ जतिन व्यंकटी सोनकांबळे हे कर्तव्यावर आहेत. दि. १३ जून २०२५ रोजी दोन ते रात्री आठ वाजेदरम्यान जतिन सोनकांबळे हे लॉकअपवर सेंट्री म्हणून कर्तव्यावर असताना त्यांनी लॉकअपमधील आरोपीचे सदर गुन्ह्यातील कुख्यात गुंड फरार आरोपी याच्यासोबत स्वतःचे मोबाईलवरून व्हिडीओ कॉलद्वारे बोलणे करून दिले.

लॉकअप ड्युटीवर कर्तव्यावर असताना लॉकअपमधील आरोपीस मोबाईल फोन किंवा इलेक्ट्रीक वस्तू वापरण्याची परवानगी नसताना पोलीस अंमलदार जतिन सोनकांबळे यांनी स्वतःचे मोबाईलवरून व्हिडीओ कॉलची सुविधा पुरवून लॉकअपमधील आरोपीचे फरार आरोपीसोबत बोलणे करून दिले. अशा प्रकारे कर्तव्यात गंभीर स्वरूपाचे व बेजाबदारपणाचे वर्तन करून, गैरशिस्त करून पोलीस दलाची प्रतिमा जनमानसात मलीन केल्याचे प्रथम दर्शनी दिसून आल्याने पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी पोलीस अंमलदार जतिन सोनकांबळे यांना दि. १७ जून २०२५ पासून निलंबित केले आहे. पुढील कायदेशीर कारवाईसाठी सविस्तर चौकशी आदेशित केली आहे.

# कोल्हापुरात धार्मिक संस्थेत अल्पवयीन विद्यार्थ्याला विजेचा शॉक देऊन ठार केले

**कोल्हापूर (प्रतिनिधी)–** राज्यातील पुरोगामी विचारांचा वारसा जपणाऱ्या कोल्हापूर जिल्ह्यात एक धक्कादायक घटना घडली आहे. कोल्हापूरच्या हातकणंगले तालुक्यातील आळते येथे एका धार्मिक शिक्षण देणाऱ्या संस्थेत अल्पवयीन विद्यार्थ्याची हत्या करण्यात आली आहे. या घटनेमुळे कोल्हापूरमध्ये एकच खळबळ उडाली आहे. फैजान नाजिमा (वय ११) असे मृत मुलाचे नाव आहे. या संस्थेतील एका अल्पवयीन मुलानेच फैजानची हत्या केल्याचे उघड झाले आहे. ही संस्था बंद पडून आपल्याला घरी जायला मिळावे, यासाठी अल्पवयीन विद्यार्थ्याने फैजानची हत्या केल्याची माहिती समोर आली आहे.

आळते येथे असणाऱ्या या धार्मिक शिक्षण संस्थेत तब्बल ८० विद्यार्थी आहेत. यापैकी बहुतांश म्हणजे ७० विद्यार्थी हे बिहारमधील आहेत. हत्या झालेला फैजान नजीमा आणि हत्या करणारा हे दोघेही बिहारचे होते. हत्या करणाऱ्या विद्यार्थ्याला बिहारमधील आपल्या गावी जायचे होते. त्यासाठी ही संस्था बंद पडावी, या उद्देशाने त्याने फैजानची शॉक देऊन हत्या केली.

# सोन्या-चांदीच्या दरात पुन्हा उसळी

**मुंबई (प्रतिनिधी)–** बुधवारी सोन्याने पुन्हा उसळी घेतली. दोन दिवसांच्या विश्रांतीनंतर सोन्याने बुधवारी पुन्हा उसळी घेतली आहे. मध्यपूर्वेतील दबावाचा फटका कच्च्या तेलाच्या निर्देशांकात दिसत असताना सोन्याच्या निर्देशांकात मात्र वाढ झाली आहे. आंतरराष्ट्रीय बाजारातील सकाळी सुरूवातीला सोन्याच्या निर्देशांकात घसरण झाली तरी डॉलरच्या तुलनेत रुपयाची घसरण झाल्याने बाजारात सोन्याच्या किंमतीत वाढ झाली. 'गुड रिटर्न्स' या संकेतस्थळावरील माहितीनुसार, २४ कॅरेट प्रति ग्रॅम सोन्याची किंमत ५४ रुपये वाढल्याने ग्रॅमचे दर १००९१ रूपयांवर आहेत. तर २४ कॅरेट प्रति तोळा किंमत ५४० रूपयांनी वाढत किंमत १००९१० पातळीवर गेली.२२ कॅरेट प्रति ग्रॅम किंमत ५० रूपयांनी वाढत ९२५० रूपये पातळीवर पोहोचली तर २२ कॅरेट प्रति तोळा किंमत ४०० रूपयांनी वाढत ९२५०० रुपये पातळीवर पोहोचली आहे.

# शिवसेना लढणार श्रीकांत शिंदेंच्या नेतृत्वाखाली बीएमसी निवडणूक



**मुंबई (प्रतिनिधी)–** मुंबई महानगरपालिकेची निवडणूक ऑक्टोबर किंवा त्या दरम्यान होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. या निवडणुकीसाठी सर्वच पक्षांनी कंबर कसल्याचं दिसून येतंय. या निवडणुका शिवसेना पक्ष श्रीकांत शिंदेंच्या नेतृत्वात लढणार आहे अशी माहिती शिवसेनेतील विश्वसनीय सूत्रांनी दिली आहे.

गेल्या काही दिवसांमध्ये श्रीकांत शिंदे यांनी मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत लक्ष घातल्याचे दिसून येत आहे. शिवसेनेच्या वर्धापनदिनाच्या तयारीसंदर्भात त्यांनी आज वरळी येथे महत्त्वाची बैठक घेतली. दरम्यान, शुक्रवारी श्रीकांत शिंदे मुंबई महापालिका निवडणुकांबाबत महत्त्वाची बैठक घेणार असल्याची माहिती समोर येत आहे.

मुंबई महापालिकेवर गेल्या अनेक वर्षांपासून उबाठा गटाची सत्ता आहे. त्यामुळे, मुंबई महापालिका कोणत्याही परिस्थितीत आपल्याकडे खेचून घ्यायचे एकनाथ शिंदे यांचे लक्ष्य आहे. त्यासाठी शाखाप्रमुखांसह अनेक बदल सर्व ठिकाणी केले जात आहेत, आणि याबद्दल सर्वतोपरी निर्णय श्रीकांत शिंदे घेणार आहे. तर उबाठा गटाचे नेतृत्व हे आदित्य ठाकरे करणार असल्याची चर्चा आहे. त्यामुळे यंदा मुंबई महापालिका निवडणुकीच्या रिंगणात आदित्य ठाकरे विरुद्ध श्रीकांत शिंदे अशी लढत होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी एकनाथ शिंदें तयारीला लागले आहेत. निवडणुकांची तारीख अद्याप जाहीर झाली नसली, तरी त्याची वाट न पाहता, त्यांनी पक्षातील मंत्र्यांना विभागनिहाय जबाबदारीचं वाटप केले आहे.

# विष्णुपुरी काळेश्वर मंदिर परिसरातील गोदावरी नदी पात्रात सोडलेल्या घाण पाण्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात

**नांदेड (प्रतिनिधी)–** शहराच्या विष्णुपुरी (काळेश्वर मंदिर परिसर) येथील मोठ्या नाल्याचे घाण पाणी गोदावरी नदी पात्रात सोडण्यात येत आहे. विशेष म्हणजे हे पाणी शासकीय रुग्णालयातून येत आहे. त्यामुळे नांदेड शहरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात येत आहे. सदरील नाल्याचे घाण पाणी शुद्धीकरण केल्यानंतर नदीपात्रात सोडावे अशी मागणी नांदेडकरांमधून होत आहे.

नांदेड शहराची तहान भागविणारी गोदावरी नदी व त्यावरील विष्णुपुरी प्रकल्प मागील काही वर्षांपासून मोठ्या प्रमाणात प्रदूषित होत आहे. मानवनिर्मित सांडपाणी थेट गोदावरी पात्रात सोडले जात आहे. शहरात जवळपास १८ ते २० नाले वाहतात. त्या सांडपाण्यावर कुठलीही प्रक्रिया न करता ते थेट नदीपात्रात सोडण्यात येत आहे. त्यामुळे नांदेडकरांच्या आरोग्यासोबतच जलचर प्राण्यांवरही त्याचा गंभीर परिणाम होत आहे. यापूर्वीही गोदावरी नदी पात्रातील लाखो जलचर प्राणी (मासे) मृत्युमुखी पडले होते.

गोदावरीचे शुद्धीकरण करावे अशी मागणी अनेक वर्षांपासून होत आहे. शहराच्या दोन-तीन ठिकाणी महापालिकेचे प्रकल्प सुरू झाले आहेत. मात्र विष्णुपुरी काळेश्वर मंदिर परिसरात एक भला मोठा नाला घाण पाणी घेऊन नदीत थेट प्रवेश करतो. विशेष म्हणजे या नाल्याद्वारे विष्णुपुरी येथे असलेल्या शासकीय रुग्णालयातील घाण पाणी तसेच रक्त मिश्रित आणि रसायन मिश्रित पाणी गोदावरी पात्रात येत आहे. त्यामुळे जलचर प्राणी यांना तर हानी होतच आहे, त्या उलट नांदेडकरांनाही या घाण पाण्याचा सामना करावा लागत आहे. अनेकांना श्वसनाचा आणि कातडीचा आजार होत आहे. नांदेडकरांच्या आरोग्याशी थेट परिणाम हे पाणी करत असल्याने संतप्त प्रतिक्रिया उमटत आहेत.

विष्णुपुरी काळेश्वर मंदिर परिसरात येणारा हा मोठा नाला एक तर बंद करावा किंवा या घाण पाण्यावर प्रक्रिया करून त्यानंतर नदीपात्रात सोडावे, जेणेकरून नांदेडकरांचे आरोग्य यासोबत जलचर प्राण्यांनाही त्या पाण्यापासून हानी पोहोचणार नाही, अशी मागणी या परिसरातील व नांदेडकरांमधून पुढे येत आहे. जिल्हाधिकारी राहुल कर्डिले आणि महानगरपालिका आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे तसेच विष्णुपुरी रुग्णालय प्रशासन यांनी या गंभीर बाबीकडे लक्ष घालावे अशी मागणी करण्यात येत आहे.



जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन

संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ

गोदातीर समाचार

संपादक
केशव घोणसे पाटील

# सैन्यदलांतही महिलांचा प्रवेश

आजच्या बदललेल्या विज्ञान आणि तंत्रज्ञान असलेल्या २१ व्या शतकामध्ये महिला देखील सर्व क्षेत्रांमध्ये आघाडीवर राहत आहेत. केवळ शारीरिक सामर्थ्यावर लढायांचे स्वरूप आता ठरत नाही. तांत्रिक कौशल्य, झपाट्याने निर्णय घेण्याची क्षमता, आणि मानसिक स्थैर्य ही नव्या युगातील लढायांची खरी गरज बनली आहे. या सर्व बाबतीत महिलाही पुरुषांइतक्याच सक्षम आहेत, हे वारंवार सिद्ध होत आहे. महिला वैमानिक, इंजिनिअर्स, डॉक्टर, आणि आता अगदी लढाऊ सैनिक म्हणूनही आपली भूमिका यशस्वीपणे पार पाडत आहेत. भारतीय सशस्त्र दलांमध्ये महिलांचे योगदान आता नव्या उंचीवर पोहोचले आहे. काही वर्षांपूर्वीपर्यंत सैन्यदल, विशेषतः नॅशनल डिफेन्स अकॅडमी ही एक पुरुषप्रधान संस्था म्हणून ओळखली जात होती. मात्र, गेल्या आठवड्यात दोन घटनांनी या परंपरेला छेद दिला आणि लष्करातील महिलांची प्रगती हे केवळ घोषणा न राहता वास्तवात साकार होत असल्याचे सिद्ध झाले. पहिली घटना म्हणजे, पहिल्यांदाच सर्व महिला नौदल, वायुदल आणि थलसेना यांच्या संयुक्त नौकाविहार मोहिमेचे यशस्वी समापन. १,८०० नॉटिकल मैलांचा समुद्र प्रवास पूर्ण करून या सर्व महिला मुंबईत परतल्या. दुसरी घटना म्हणजे खडकवासला येथील एनडीएच्या १४८ व्या तुकडीमध्ये १७ महिला कॅडेट्सनी यशस्वीरीत्या पदवी प्राप्त केली. पुरुष समकक्षांप्रमाणेच महिलांनीही पदवीदान समारंभात भाग घेतला आणि लष्करी सेवेत समतेचा नवा अध्याय लिहिला. ही वाटचाल सहज झाली नाही. सर्वोच्च न्यायालयाच्या २०२१ मधील ऐतिहासिक निर्णयानंतर महिला उमेदवारांना 'एनडीए'मध्ये प्रवेश मिळू लागला. याआधी महिला केवळ ऑफिसर्स ट्रेनिंग अकॅडमी किंवा इंडियन मिलिटरी अकॅडमीद्वारे लष्करामध्ये प्रवेश करत असत. एनडीएचा मार्ग मात्र त्यांच्यासाठी बंद होता. पण २०२० मध्ये कोर्टाने महिलांना लष्करात 'परमनंट कमिशन' मिळावा असा आदेश दिला आणि पुढील वर्षी एनडीएच्या परीक्षेसाठी महिला पात्र ठरल्या. ही मोठी सामाजिक आणि लष्करी क्रांती होती. सैन्यदलांमध्ये महिलांचा प्रवेश रोखण्यासाठी दीर्घकाळ अनेक कारणांची ढाल वापरली गेली. जसे शारीरिक मर्यादा, कौटुंबिक जबाबदाऱ्या, नेतृत्व स्वीकारण्यातील अडचणी, लैंगिक छळाची भीती किंवा सुविधा नसणे. मात्र कोर्टाच्या हस्तक्षेपामुळे आणि सामाजिक जागृतीमुळे या अडथळ्यांचा पाडाव झाला. आज महिलाही सशस्त्र दलांमध्ये कर्तृत्व गाजवत आहेत. महिलांच्या सहभागामुळे लष्करी क्षेत्रात समतेची उणीव भरून निघते आहे. शालेय वयातील मुलींना सैनिकी शाळांमध्ये प्रवेश देण्याचा केंद्र सरकारचा निर्णयही लष्करी क्षेत्रात महिलांच्या सहभागास चालना देणारा आहे. यामुळे लहान वयातच त्यांना शिस्त, देश-सेवा आणि नेतृत्वगुणांची शिकवण दिली जाईल. यातून पुढील पिढीला प्रशिक्षित महिला लष्करी अधिकारी लाभतील, हे नक्की. या पार्श्वभूमीवर एनडीएच्या शिबिरां-मध्ये महिला कॅडेट्ससाठी स्वतंत्र सुविधा, प्रशिक्षण व निवासाची व्यवस्था उभारणे आवश्यक आहे. संस्थात्मक पातळीवर महिलांना योग्य वातावरण देणे ही शासन व लष्कराची जबाबदारी आहे. महिलांचा सहभाग केवळ संख्येपुरता न राहता, नेतृत्त्वाच्या संधी, पदोन्नती आणि निर्णय प्रक्रियेतही त्यांना समान वाव मिळणे गरजेचे आहे. आज जेव्हा १७ महिला कॅडेट्स एनडीएमधून पास आऊट होतात, तेव्हा ही केवळ आकड्यांची बातमी नाही, तर देशाच्या संरक्षण व्यवस्थेत होत असलेल्या मूलगामी बदलांची जाणीव आहे. भारताची लष्करी शक्ती केवळ शस्त्रांवर नाही, तर तिच्या सैनिकांच्या विविधतेवर आधारित असते. महिला सामील झाल्यामुळे ही शक्ती अधिक व्यापक, समतोल आणि संवेदनशील बनते. ही सुरुवात आहे, अजून बरेच टप्पे गाठायचे आहेत. पण आजचा टप्पा ऐतिहासिक आहे, कारण तो केवळ महिलांसाठी नाही, तर संपूर्ण लष्कराच्या भविष्याचा नव्या दृष्टिकोनाने विचार करणारा आहे. महिला कॅडेट्सची उपस्थिती भारतीय सैन्यदलातील नव्या युगाची नांदी ठरते. आता यापुढे 'महिला' ही केवळ सवलतीची नव्हे, तर सामर्थ्याची ओळख ठरणार आहे.

# आषाढी वारी म्हणजे महाराष्ट्राचा लोकोत्सव!




आषाढ महिना सुरू झाला की, वेध लागतात ते पंढरीच्या वारीचे. लाखो वारकरी देहू आणि आळंदीत जमा होतात. डोईवर तुळशी वृंदावन व विठ्ठल रखुमाईच्या मूर्ती, हाती टाळ-मृदंग, मुखी विठ्ठल, विठ्ठल जयहरी विठ्ठलचा गजर करीत ज्ञानोबा - तुकारामांचा जयघोष करीत व खांद्यावर भागवत धर्माची भगवी पताका फडकवीत विठुरायाच्या भेटीसाठी लाखो वैष्णवांचा मेळा निघतो. हे दृश्य डोळ्यांचे पारणे फेडणारे असते.

आषाढी वारी म्हणजे महाराष्ट्राचा लोकोत्सव! पालखी सोहळा हे महाराष्ट्राचे वैभव आहे. १३ व्या शतकात ही परंपरा असल्याचे उल्लेख सापडतात. संतश्रेष्ठ ज्ञानोबा माऊलींच्या घराण्यात पंढरीच्या वारीची परंपरा होती. त्यांचे वडील वारीला जात असल्याचा उल्लेख आढळतो. ज्ञानदेवांनी भागवत धर्माची पताका खांद्यावर घेऊन सर्व जातीपातीच्या समाजाला एकत्रितपणे या सोहळ्यात सामील करुन घेतले. हेच व्यापक स्वरूप जपत एकनाथ महाराज, तुकाराम महाराज यांसारख्या संतांनी वारीची परंपरा पुढे चालवली.

गेली कित्येक वर्षे सुरू असलेली ही महाराष्ट्राची परंपरा आता देशातच नाही तर विश्वात लोकप्रिय झाली आहे. संपूर्ण महाराष्ट्रातून वारकरी व भाविक वारीमध्ये सहभागी होतात. महाराष्ट्रातूनच नव्हे तर गुजरात, मध्यप्रदेश, आंध्रप्रदेश, कर्नाटक, तेलंगणा या राज्यातूनही लोक वारीमध्ये सहभागी होतात. आता तर परदेशातूनही लोक खास वारी अनुभवण्यासाठी महाराष्ट्रात येतात. दिवसेंदिवस वारीतील वारकऱ्यांची संख्या वाढत चालली आहे. १९६५ च्या सुमारास आळंदीच्या पालखीमध्ये पाच हजार वारकरी सहभागी झाल्याचा उल्लेख दि. ब. मोकाशी यांच्या पुस्तकात आढळतो. आज ती संख्या लाखोंच्या घरात पोहचली आहे. वृद्धां-प्रमाणे तरुणही आता वारीत सहभागी होत आहेत. सहकुटूंब वारी करणाऱ्यांची संख्याही वाढली आहे. कुठलीही जाहिरात न करता, मार्केटिंग न करता लाखो भाविक वारीत सहभागी होतात.

**वारी म्हणजे नियोजनाचे सर्वोत्तम उदाहरण!**

मार्च महिन्यातच दिंडीचे नियोजन होते. दिंडीतील सहभागी वारकरी, आचारी, शिधा, मुक्कामाची सोय याचे सर्व नियोजन मार्च महिन्यातच होते. मार्च महिन्यात सुरू झालेले हे दिंडीचे नियोजन दिंडी पुन्हा गावी परत येण्यापर्यंतचे असते. वारीतील शिस्त तर काय वर्णवावी! कोठेही गडबड, गोंधळ नसतो. स्वयंशिस्तीने चालणाऱ्या वारकऱ्यांना आस असते ती केवळ विठुरायाच्या भेटीची! लाखो वारकरी एकत्रित असूनही त्यांच्यातील शिस्त कधी बिघडत नाही. त्यांची शिस्त समाजाला दिशा देणारीच असते. पालखी मार्गावर पालख्यांचे दर्शन घेण्यासाठी हजारो भाविक उभे असतात. साधू, संत येती घरा...तोचि दिवाळी दसरा! ही भावना त्यामागे असते.

अनेक सेवाभावी संस्था दिंडीतील वारकऱ्यांसाठी फराळ व आहाराचे वाटप करतात. शासन स्तरावरून देखील पालख्यांचे योग्य नियोजन केले जाते. पिण्याच्या पाण्याची व मुक्कामाची योग्य सोय केली जाते. वारी दरम्यान गृह विभागाकडून चोख सुरक्षा व्यवस्था पुरवली जाते. आरोग्य विभाग वारकऱ्यांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी तत्पर असते. तज्ज्ञ डॉक्टरांचे पथक कायम वारकऱ्यांच्या सेवेसाठी उपलब्ध असते. आतातर नेटकरी नेटवरही वारीचे अपडेट देत असतात. फेसबुक, ट्विटर सारख्या सोशल मीडियावर देखील आता वारीचा अनुभव घेता येतो. त्यामुळे वारीदेखील आता ग्लोबल झाली असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

**-श्याम ठाणेदार**
दौंड, जि. पुणे

# युवकांनो, कर्तव्याची जाण आणि जबाबदारीचे भान ठेवा!



आजकालचे युवक आपले कर्तव्य आणि आपली जबाबदारी पूर्णपणे विसरून गेले आहेत, आणि नको त्या फालतू छंदात वेळ वाया घालवत आहेत. त्यांना स्वतःच्या कर्तव्याची जान आणि जबाबदारीचे भान जराही राहिले नाही. आपली जबाबदारी आणि आपले कर्तव्य काय आहेत? आणि आपण सध्या काय करत आहोत? याचा त्यांना विसर पडला आहे. म्हणूनच ते आपले कर्तव्य आणि जबाबदारी विसरून नको त्या दिशेला भरकटत जात आहेत. आणि स्वतःच्या पायावर स्वतःच्या हाताने धोंडा मारून घेत आहेत. आपल्याच हाताने आपलेच जीवन बरबाद करून घेत आहेत. वाईट व्यसनाच्या आहारी जाऊन स्वतःला व्यसनाच्या विखारी विळख्यात ओढत आहेत. दारू, सिगारेट व गांजा या जीवघेण्या व्यसनाच्या आहारी जाऊन स्वतःला विनाशाच्या उंबरठ्यावर नेत आहेत, आणि स्वतःच्या हाताने मृत्यूला जवळ करत आहेत. व्यसनी तरुणांचा देश ही भारताची नवी ओळख जगा-समोर आली आहे. आपल्या भारतात मिसरूड न फुटलेले अगदी पाच ते सहा वर्षांची मुले देखील व्यसन करण्यात आघाडीवर आहेत. मग या नादात हे युवक कशाला कर्तव्याची जाण आणि जबाबदारीचे भान ठेवतील.

हल्ली युवक शिक्षणाच्या नावाखाली आपल्या वडिलांकडून भरपूर पैसा मागवत आहेत आणि तो पैसा शिक्षणाला न लावता ढाब्यावर जाऊन मौजमजा करण्यात लावत आहेत. शिक्षण शिकायचे सोडून मवाली पोरांसोबत टवाळक्या करत फिरत आहेत. वाईट व्यसनाने नुसते बरबटून गेले आहेत. खरे तर युवकांनी तरुणपणात खूप खूप शिक्षण शिकून आपले जीवन ध्येय गाठायला हवे.शिक्षणाच्या जोरावर एखादी नोकरी काबीज करायला हवी. आई-वडिलांचे, गावकऱ्यांचे व समाज बांधवांचे स्वप्न साकार करायला हवे. नंतर सामाजिक बांधिलकी म्हणून किंवा सामाजिक कर्तव्य व जबाबदारी म्हणून युवकांनी स्वतः शिक्षित होऊन इतरांनाही शिक्षणाचे महत्त्व समजावून सांगावे, जेणेकरून ते युवक शिक्षणाच्या माध्यमातून समाजाला प्रगतीपथावर नेऊ शकतील. त्याचबरोबर युवकांनी पर्यावरणाचे महत्त्व ओळखून पर्यावरणाची जीवापाड काळजी घेणे हे देखील खूप महत्त्वाचे काम आहे. त्यांनी प्रदूषण कमी करण्यासाठी आणि पर्यावरणाची सुरक्षा करण्यासाठी सतत प्रयत्नशील असायला हवे. युवकांनी समाजात समता, बंधुता आणि न्याय प्रस्थापित करण्यासाठी लढा उभारायला हवा. समाजातील अन्याय, अत्याचार दूर करण्यासाठी आटोकाट प्रयत्न करायला हवेत. युवकांनी आपल्या कला आणि कौशल्याचा उपयोग सम ाजासाठी व देशासाठी करावा. युवकांनी एक जबाबदार नागरिक म्हणून समाजाच्या विकासात सक्रियपणे सहभाग नोंदवावा. युवकांनी समाजाला दिशा देण्यासाठी उत्तम नेतृत्त्वाची भूमिका पार पाडावी. तसेच नेहमी सकारात्मक दृष्टिकोन ठेवावा आणि समाजाला प्रेरित करावे. गोरगरीब, वंचित, उपेक्षित व तळागाळातील युवकांच्या शिक्षणाला थोडाफार हातभार लावावा. त्यांना शक्य होईल तेवढी आर्थिक मदत करावी, आणि त्यांना सुद्धा आपल्या बरोबरीला आणून त्यांच्या जीवनात आनंदाची व चैतन्याची मंगलमय पहाट आणावी. गोरगरीब, सर्वसामान्य व तळागाळातील मुलींच्या लग्नाला आर्थिक हातभार लावावा. अनाथांना व वृद्धांना आश्रमात जाऊन कपडे, भेटवस्तू व अन्नदान वाटप करावे. आपल्या आई वडिलांना सुखाचे व आनंदाचे क्षण दाखवावेत. त्यांना कष्टाची कामे करू देऊ नयेत. त्यांना खूप खूप जीव लावावा. विशेष करून उतारवयात त्यांची अधिक काळजी घ्यावी. त्यांना वेळेवर जेवण द्यावे आणि त्यांचा वेळेवर दवाखाना करावा. पत्नीचे ऐकून त्यांना अंतर देऊ नये. त्यांची हेळसांड करू नये. नाहीतर आजकाल शिकून नोकरीला लागलेले काही महाभाग पत्नीचे ऐकून आई-वडिलांना वृद्धाश्रमात पाठवत आहेत. त्यांना घाण घाण शिव्या देऊन घराबाहेर काढत आहेत. हे आपण सर्वजण डोळ्यांनी पाहत आहोत. म्हणून युवकांनो आपल्याला कळकळीची नम्र विनंती आहे की, आपण आई-वडिलांसोबत असे अमानुष प्रकार न करता, त्यांना गद्दार न होता आणि त्यांना वृद्धाश्रमाचा रस्ता न दाखवता त्यांना खूप खूप जीव लावूया, त्यांना अगदी आनंदात व मजेत ठेवून त्यांना सुखाचे दिवस दाखवूया, कारण आई-वडिलांनी आपल्यासाठी खूप खूप खस्ता खाऊन व प्रसंगी सावकाराचे कर्ज काढून आपल्याला उच्च शिक्षण शिकवलेले असते. त्यांच्या जीवावरच तर आपला उच्च शिक्षणाचा डोलारा उभा असतो. हे आपण कधीच विसरता कामा नये. त्यांनी आपल्याला खूप खूप कष्ट करून आपल्या शिक्षणाला पैसा लावलेला असतो.

आपण नोकरीला लागेपर्यंत त्यांना एकदिवस सुध्दा सुखाची झोप लागत नसते. मग आपण नोकरीला लागल्यावर आई-वडिलांना सुखात ठेवणे व म्हातारपणात त्यांचे योग्य पालनपोषण करणे हे आपले कर्तव्य व जबाबदारी असते. हे आजच्या युवकांनी लक्षात ठेवायला हवे. पण आजकाल कोण लक्षात घेतो? आजकाल नोकरीला लागलेले युवक सामाजिक बांधिलकी व जबाबदारी विसरून, आई-वडिलांना गावी ठेवून नोकरीच्या ठिकाणी स्थायिक होतात आणि तिकडेच पत्नीच्या आदेशाप्रमाणे जीवन जगतात. तिकडच्याच दुनियेत बायको लेकरांसोबत रममान होतात. समाज बांधवांना व आई-वडिलांना मदत करायची असते हे विसरून जातात. नेमके हेच डॉ. बाबासाहेबांना अपेक्षित नव्हते. डॉ. बाबासाहेब म्हणायचे की, लावलेला एक दिवा हजारो दिव्यांना प्रज्वलित करू शकतो. म्हणजे एक नोकरीला लागलेला समाज बांधव आपल्या हजारो बांधवांना आपल्या बरोबरीला आणू शकतो, पण आजकालच्या लोकांची मानसिकता फार गढूळ झाली आहे. त्यांना वाटत आहे की, माझ्यासारखा उच्चपदस्थ अधिकारी दुसरा कोणीच होऊ नये, समाजात मलाच अधिक मान मिळावा, मीच भरपूर पैसा व संपत्ती कमवावी आणि इतरांनी फक्त माझ्याकडे बघत राहावे. साहेब, साहेब करत माझ्या मागे पुढे फिरावे.असे आजकालच्या नोकरदारांना वाटत असते. म्हणजे आजकालचे नोकरदार स्वार्थी व मतलबी झाले आहेत. त्यांना फक्त आपलेच भले व्हावे वाटत आहे. आणि इतरांचे वाटोळे व्हावे वाटत आहे.

आपल्या महापुरुषांनी जर स्वतःचा स्वार्थ पाहिला असता तर ते आज खूप श्रीमंत झाले असते, पण आज आपण कुठे असतो? कोणाच्या तरी दावणीलाच बांधलेले गुलाम असतो ना? याचा एकदा विचार करून बघा. आपले महामानव स्वतः शिकले, मोठे झाले आणि समाजालाही मोठे केले आणि आपल्यालाही खूप खूप शिकून मोठे व्हा, आणि आपल्याबरोबर समाज बांधवांनाही मोठे करा असे सांगून गेले. मग माझा आजच्या नोकरदारांना प्रश्न आहे की, आपण नोकरीला लागल्यावर किती लोकांना आपल्या बरोबरीला आणले? किती समाज बांधवांचा उद्धार केला? महापुरुषांच्या नावाचा डंका आजही संपूर्ण जगभर गाजत आहे. हे केवळ त्यांनी केलेल्या कार्यामुळेच! हे आजच्या नोकरदार वर्गाने मनोमन ध्यानात ठेवून थोडा विचार करायला हवा.

आज या महापुरुषांना जाऊन कित्येक वर्षे झाली आहेत, तरी देखील हे महामानव समस्त भारतीयांच्याच नव्हे तर अख्या जगाच्या मनावर अधिराज्य गाजवत आहेत. आपण देखील स्वतः बरोबरच समाजाचा आणि देशाचा विचार केला तर नक्कीच आपण देखील मेल्यानंतर सुध्दा लोकांच्या मनावर अधिराज्य गाजवत राहाल.कारण बांधवांनो मेल्यावर आपल्याला काहीच सोबत घेऊन जायचे नाही, जसे रिकाम्या हाताने आलोय तसेच एकदिवस रिकाम्या हातानेच जावे लागणार आहे... म्हणून जीवनात असे काहीतरी ऐतिहासिक व अलौकिक कार्य करा की, मेल्यानंतरही तुमचे नाव एक चांगला व्यक्ती म्हणून पंचक्रोशीत आदराने निघत राहील.

**-बुध्दभूषण कांबळे**
खंडाळी, ता. अहमदपूर
जि. लातूर
मो. ७४९८७१५६६१

## लेकीच्या लग्नासाठी ठेवीचे पैसे मिळेनात, बँकेच्या गेटवर बापाने घेतला गळफास

**बीड** - बीडच्या गेवराई तालुक्यातील खळेगावात धक्कादायक प्रकार समोर आला. ठेवीदार सुरेश आत्माराम जाधव यांनी छत्रपती मल्टीस्टेट बँकेच्या गेटला गळफास घेऊन आत्महत्या केली. जाधव यांच्या छत्रपती मल्टीस्टेट बँकेत ११ लाख आणि ज्ञानराधा मल्टीस्टेटम ध्ये ५ लाख रुपये अडकले होते. मुलीच्या लग्नासाठी पैशांची गरज होती. मात्र सतत बँकेच्या फेऱ्या मारूनही त्यांना रक्कम परत मिळाली नाही. या मानसिक त्रासामुळे त्यांनी हे टोकाचं पाऊल उचललं. रात्री उशिरा कुटुंबासह बँकेत गेलेले जाधव, काही वेळातच बँकेच्या गेटवर मृत अवस्थेत आढळले. या प्रकारामुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून, मल्टीस्टेट बँकांची विश्वासार्हता पुन्हा एकदा सम ोर आली आहे.

मुलीच्या लग्नासाठी ठेवलेले पैसे परत न मिळाल्याने बीडच्या गे-वराई तालुक्यातील खळेगावात एका वडिलांनी टोकाचं पाऊल उचललं. छत्रपती मल्टीस्टेट बँकेच्या गेटला गळफास घेऊन त्यांनी आत्महत्या केली. या प्रकारामुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून, मल्टीस्टेट बँकांवरील विश्वासार्हतेवर पुन्हा प्रश्नचिन्ह उभं राहिलं आहे. सुरेश आत्माराम जाधव असं आत्महत्या केलेल्या वडिलांचे नाव असून, त्यांचे छत्रपती मल्टीस्टेट बँकेत ११ लाख तर ज्ञानराधा मल्टीस्टेट बँकेत ५ लाख रुपये अडकले होते.

# रस्ते पूल विकासाचे मार्ग की धोक्यांचे?



पुणे जिल्ह्यातील मावळ तालुक्यातील कुंडमाळा या पर्यटन स्थळावर जाण्यासाठी इंद्रायणी नदीवरील लोखंडी पूल कोसळून मोठी दुर्घटना घडली. त्यात चार पर्यटक ठार झाले असून, सहा पर्यटक गंभीर जखमी तर पन्नासहून अधिक पर्यटक पुलावरून कोसळल्यामुळे ते जखमी झालेत. यात अनेक जण वाहून गेल्याची ही शंका व्यक्त केली जात आहे. या दुर्दैवी घटनेनंतर सदर पुल हा धोकादायक होता हे स्पष्टचं होत आहे. कुंडमाळा येथील इंद्रायणी नदीवरील पुल हा चारशे सत्तर फुटांचा आहे. तो पुल दोन टप्प्यांत असून शंभर- शंभर फुटांचे दोन लोखंडी साकव, तर दोनशे फुटांचा सिमेंटचा रस्ता व पुलावरील आतली रुंदी एका वेळेस एक दुचाकी दोन माणसे जाईल एवढीच असल्याचे सांगितले जाते. दुर्घटनेच्या प्रसंगी या पुलावर दीडशे- दोनशे पर्यटक, काही दुचाकी वाहने एकाच वेळी जमल्यामुळे ओव्हरलोड सहन झाल्यामुळे हा पूल खळखळत्या इंद्रायणीच्या पात्रात कोसळल्याने ही दुर्घटना घडली.

मागील दोन आठवड्यांपासून पुणे जिल्ह्यात दमदार पाऊस झाल्यामुळे निसर्ग सौंदर्य फुलले फुलून गेले आहे मावळ परिसर निसर्ग संपन्न असून दरवर्षी पर्यटक संपूर्ण जिल्ह्यातूनच नव्हे तर मुंबई -ठाणे परिसरातून सुद्धा मोठ्या संख्येने येतात. एकंदरीत पर्यटकांची शनिवार रविवार या सुट्टीच्या दिवशी मोठ्या संख्येने गर्दी होत असते. निसर्ग सौंदर्याने भरलेल्या सह्याद्रीच्या डोंगर भागात पर्यटकांना मोठी चालना आहे. मात्र गर्दीचे व्यवस्थापन व व सुरक्षिततेचा अभाव हा प्रतिवर्षी दिसून येतो. इंद्रायणी नदीच्या पात्रात असलेले कुंडजाई मातेचे मंदिर आणि त्याच्या बाजूला कुंडमाळा गाव या विरुद्ध असलेले शेकारवाडी गाव या दोघांना जोडणारा लोखंडी साकव स्थानिकांना व शेतकऱ्यांना रोजच्या रहदारीसाठी सुमारे ३० वर्षांपूर्वी उभारण्यात आल्याचे सांगितले जाते. मात्र हा पुल अलीकडच्या काळात जीर्ण झाल्याच्या तक्रारी व नूतनीकरणाची मागणी ग्रामस्थांकडून वेळोवेळी करण्यात येत होती. या बाबीकडे विशेष लक्ष दिले असते तर कदाचित ही घटना आज टळली असती. एकंदरीत प्रशासनाच्या गलथन कारभाराम ुळे ही दुर्घटना ओढवली असे म्हणणे गैर ठरणार नाही.

कुंडमाळ्यामध्ये वीकेंडला आठ ते दहा हजार पर्यटकांची गर्दी होत असते. दुर्घटनेच्या दिवशी गर्दीचा उच्चांक होता. आधीच पुल जीर्ण असल्यामुळे पुलावर असलेल्या दीडशे ते दोनशे लोकांचा भार न सोसल्यामुळे पुल पर्यटकांसह खळखळत्या इंद्रायणीच्या पात्रात कोसळला. प्रत्यक्षदर्शी पर्यटकांनी घटनेच्या पाच मिनिटे आधी पुल थरथरत कापत असल्याचे सांगितले आहे. मुळात पुल हा ओव्हरलोड सहन न झाल्यामुळे दुर्घटना घडल्याचे हे आता स्पष्ट होते. देशासह राज्यात दरवर्षी प्रामुख्याने पावसाळ्यात पुल खचणे,वाहून जाणे आदीं सारख्या घटना होतात. परंतु ज्यावेळेस मोठी जीवित हानी होते, तेव्हा मात्र प्रशासनाला जाग येते. हेच मोठे दुर्दैव आहे. देशातील रस्ते दळणवळ-णाचे महामार्ग, विकासाचे पहिले मानले जात असताना पुलांच्या स्ट्रक्चरल ऑडिट होत नसल्याच्या बातम्या वेळोवेळी येतात. राज्यात अनेक भागात आजही ब्रिटिशकालीन पुलांची संख्या मोठी आहे. त्या पुलांची अवस्था डळमळीत आहे.

राज्यातील असंख्य मार्गावरील पूल अनेक वर्षांपासून अपूर्ण व्यवस्था अवस-थेत दिसून येतात.मुळात पावसाळ्याच्या तोंडावर ते मुदतीत पूर्ण करून घेणे प्रशासनाची जबाबदारी नव्हे काय? निर्माणाधिन पूलांच्या कामाच्या ठिकाणी पर्यायी पुल वाहतुकीसाठी असतो. परंतु तो पुरामुळे टिकेलच याची हमी नसते. शिवाय ते कमी उंचीचे असल्यामुळे त्या पुलावरील पावसाचे पाणी दोन-दोन दिवस ओसरत नाही. नाईलाजाने न परवडणाऱ्या खडतरआणि लांबच्या मार्गाने प्रवास करावा लागतो.

सामान्य नागरिकांना होणारा मानसिक, शारीरिक त्रासाशिवाय वाहनावर होणारा वाढत्या इंधनाचा बोझा लादला जातो. एकीकडे अब्जावधी रुपये खर्चून जलद महामार्ग बनवण्याकडे शासनाचे विशेष लक्ष असते.तर दुसरीकडे ग्रामीण भागातील रस्ते व त्यावरील पुलांकडे अक्षम्य असे दुर्लक्ष का! रस्ते व पूल विकासाचे द्योतक मानले जात असतानाच याचे संरक्षण व संवर्धन होणे तेवढेच गरजेचे नाही का..?

**-शशिकांत मधुकर तोटे**
दारव्हा, जि. यवतमाळ
मो. ९१३०८३५४५८

## थोडक्यात...

### शेतकऱ्यांसाठी तालुकास्तरावर विशेष मेळाव्याचे आयोजन

**नांदेड (प्रतिनिधी)**– नांदेड येथे कृषि विभागामार्फत राष्ट्रीय कृषि विकास योजना प्रति थेंब अधिक पीक योजनेंतर्गत अनु.जाती व अनु.जमाती संवर्गाच्या शेतकऱ्यांसाठी तालुकास्तरावर १५ ते ३० जून २०२५ या पंधरवाड्यात विशेष मेळावा आयोजीत करण्यात आला आहे. या मेळाव्यामध्ये प्रधानमंत्री कृषि सिंचन योजनेंतर्गत लाभ देण्यात येणाऱ्या ठिबक व तुषार सिंचनाबाबत तालुका, मंडळस्तरावर व तसेच गावोगावी माहिती देण्यात येणार आहे. नांदेड जिल्ह्यास अनु. जाती व अनु. जमाती संवर्गातील शेतकऱ्यांसाठी लक्षांक उपलब्ध असून लक्षांकापेक्षा कमी अर्ज प्राप्त झाले आहे. त्यामुळे जिल्ह्यातील अनु. जाती व अनु. जमातीच्या जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा. अधिक माहितीसाठी तालुका कृषि अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी डी. आर. कळसाईत यांनी केले आहे.

### इतर मागासवर्गीयांसाठी विविध कर्ज योजना

**नांदेड (प्रतिनिधी)**– महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ यांच्या उपकंपनी जगत्ज्योती महात्मा बसवेश्वर आर्थिक विकास महामंडळ, संत काशिबा गुरव युवा आर्थिक विकास महामंडळ व संत सेनाजी महाराज केशशिल्पी महामंडळ या तिन्ही महामंडळामार्फत इतर मागासवर्गीय समाजाच्या सर्वांगीण कल्याणाकरीता बेरोजगारांसाठी स्वयंग उद्योगासाठी विविध कर्ज योजना राबविण्यात येत आहेत. इतर मागासवर्गीय प्रवार्गातील गरजु व कुशल व्यावसायीक व्यक्तींना कृर्षी सलग्न व पारंपारीक उपक्रम, लघु उद्योग व मध्यग उद्योग उत्पादन, व्यापर विक्री सेवाक्षेत्र इत्यादी व्यवसासाठी या महामंडळाच्या विविध योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# 'ग्लँडर्स'चा प्रादूर्भाव ! किनवटमधील मोकाट गर्दभ, खेचरांचा बंदोबस्त करण्याची गरज

**किनवट (प्रतिनिधी)**– घोडे, गर्दभ (गाढव) तसेच खेचरांना ग्लँडर्स नावाच्या संसर्गजन्य आजाराची लक्षणे दिसून येत आहेत. या पार्श्वभूमिवर शहरातील शेकडो मोकाट गाढव व खेचरांचा बंदोबस्त करण्याची गरज आहे. याबाबत स्थानिक पत्रकारांनी सहायक जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देऊन अवगत केले आहे.



नांदेडमध्ये काही दिवसांपूर्वी 'ग्लँडर्स' या संसर्गजन्य आजाराचा प्रादुर्भाव झालेला एक घोडा आढळून आला. त्यानंतर जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा पशुधन अधिकारी आदी संबंधित अधिकाऱ्यांची गेल्या आठवड्यात नांदेड येथे बैठक घेतली. त्यात त्यांनी 'ग्लँडर्स'चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी उपाययोजना करण्याचे आदेश दिले आहेत.किनवट शहरात आजघडीला पाचशेच्यावर गाढव, खेच्चरांची संख्या आहे. गाढव, खेचर मालक दररोज या जनावरांच्या पाठीवरून वाळू वाहतूक करतात. वाळू वाहतुकीनंतर या जनावरांना मोकाट सोडून देतात. यामुळे शहराच्या सर्व गल्लीबोळासह गावालगतच्या शिवारात गाढव, खेचर घोळक्याने हैदोस घालतात. गाढवांच्या सुसाट धावण्यामुळे गेल्या ३ वर्षात अनेक जणांचे अपघात झाले आहेत. मोकाट गाढवांना आवर घालण्याबाबत पालिका प्रशासनाला नागरिकांनी वारंवार विनंती करुनही पालिकेने याकडे साफ दुर्लक्ष केले आहे. पालिकेचा कोंडवाडा नावालाच आहे. सध्या पावसाळ्याचे दिवस असल्याने मानवासह जनावरांना विविध संसर्गजन्य आजाराची लागण होण्याची शक्यता असते. मोकाट गाढव, खेचरांपैकी कांही गाढव, खेचरांना मान, पाठीवर जखमा दिसून येतात. या जनावरांना मालकाकडून खायला चारा – पाणीही मिळत नाही. तिथे या जनावरांना उपचार कसे मिळणार? 'ग्लँडर्स'च्या पार्श्वभूमीवर किनवट शहरातील मोकाट गाढव, खेचरांना आवर घालण्यासाठी तातडीने उपाययोजना करावी, अशी मागणी स्थानिक पत्रकारांच्यावतीने मंगळवारी दि.१८ येथील सहायक जिल्हाधिकारी झेनित चंद्रा दोन्तुला यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

### तपासणी पथक येणार!

'ग्लँडर्स'च्या पार्श्वभूमीवर नांदेड येथून सर्व चिकित्सक तसेच बिलोली तालुक्यातील सगरोळी येथील धर्मा डाँकी सँचुयरीचे एक पथक लवकरच किनवट दौऱ्यावर येणार आहे. कोरोना टेस्टप्रमाणे वरील पथक काही गाढव, खेचरांचे नमुने घेणार आहे. संकलित नमुने भोपाळच्या प्रयोगशाळेकडे पाठविण्यात येणार आहे, अशी माहिती किनवट पंचायत समितीचे पशुधनविकास अधिकारी डॉ. उमेश धोंड यांनी दिली आहे.

# आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त वृक्षारोपण, स्वच्छता व हरीत उपक्रमांचे आयोजन

**नांदेड (प्रतिनिधी)** – ११ व्या आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त २१ जून २०२५ रोजी नांदेड जिल्ह्यात जल जीवन मिशन व स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) टप्पा २ अंतर्गत विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमांतर्गत जिल्ह्यातील सर्व ग्राम पंचायतींमध्ये ग्राम आरोग्य, पोषण, पाणी पुरवठा व स्वच्छता समित्यांच्या सहकार्याने योग सत्रांबरोबरच वृक्षारोपण, गाव स्वच्छता व पर्यावरणीय उपक्रम राबविले जाणार आहेत, अशी माहिती जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक मेघना कावली यांनी दिली.

हरित योग या संकल्पनेअंतर्गत यावर्षी योग दिन साजरा होत असून पारंपरिक योगासोबतच पर्यावरणपूरक उपक्रमांना प्रोत्साहन दिले जाणार आहे. त्यामुळे योगसत्रासोबत वृक्षारोपण, स्वच्छता अभियान, जलस्रोत व पायाभूत सुविधांची स्वच्छता आणि पर्यावरणीय जागृती हे घटकही कार्यक्रमात समाविष्ट करण्यात आले आहेत. या सर्व उपक्रमांमध्ये ग्राम आरोग्य, पोषण, पाणीपुरवठा व स्वच्छता समित्यांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे प्रभावी आयोजन करण्यासाठी योग संगम पोर्टलवर नोंदणी व मार्गदर्शक सूचना QR कोडव्दारे उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. तसेच योग सत्रे जल जीवन मिशन व स्वच्छ भारत अभियान अंतर्गत केलेल्या स्वच्छ परिसरात योगाचे आयोजन करण्यात यावे.

२१ जून रोजी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत विशाखापट्टणम येथून देशव्यापी योग संगम कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण सकाळी ६:३० ते ७:४५ या वेळेत होणार असून, त्याचवेळी जिल्ह्यातील सर्व गावांमध्ये सामूहिक योगसत्र पार पडणार आहे. गाव स्तरावरील ग्राम आरोग्य, पोषण, पाणीपुरवठा व स्वच्छता समित्यांनी स्थानिक पातळीवर या कार्यक्रमाचे आयोजन करताना परिसर स्वच्छता, पायाभूत सुविधा व जलस्रोत स्वच्छ ठेवावेत, तसेच सहभागाचे छायाचित्र शासन संकेतस्थळावर अपलोड करावेत, असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक मेघना कावली यांनी केले आहे.

गाव स्तरावर सदर उपक्रम यशस्वी करण्यासाठी ग्रामस्थानी पुढाकार घ्यावा, असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली, जल जीवन मिशनचे प्रकल्प संचालक तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी नारायण मिसाळ, कनिष्ठ प्रशासन अधिकारी सौ. पी.आर. पवार, संवाद सल्लागार डॉ. नंदलाल लोकडे व जिल्हा समन्वयक सुशिल मानवतकर यांनी केले आहे.

# लोह्यात शनिवारी 'योग पहाट '

**लोहा (प्रतिनिधी)** – जागतिक योगा दिनानिमित्त लोहा शहरात शनिवारी (दि.२१ जून) रोजी 'योग पहाट' चे आयोजन करण्यात आल्याची माहिती भाजपा महिला मोर्चाच्या प्रदेश उपाध्यक्षा सौ. प्रणिताताई देवरे –चिखलीकर यांनी दिली आहे.

दि.२१ जून हा जागतिक योग दिन हा संपूर्ण जगामध्ये साजरा करण्यात येतो. 'करा योग, रहा निरोग' याप्रमाणे पहाटे योगा करणे व अनेक रोगांना पळविणे शारिरीक व मानसिक दृष्ट्या मजबूत होण्यासाठी भारताने जगाला योगाची देणगी दिली. आपल्या भारत देशात तथागत गौतम बुद्ध यांच्या प्राचिन काळापासून भारतात योगा सुरू झाले आहे. आता आधुनिक काळात योगगुरू श्री रामदेव बाबा यांनी योगाला देशाच्या कानाकोपऱ्यात पोहचविले व तसेच आपल्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारतीय योगा संपूर्ण जगभर पुन्हा पोहचविला आहे. त्यानुसार दि. २१ जून हा जागतिक योगा दिवस साजरा करण्यात येतो.

या निमित्त लोहा शहरात दरवर्षीप्रमाणे यंदाही शनिवारी दि. २१ जून हा जागतिक योगा दिवस साजरा करण्यात येणार आहे. लोहा शहरातील कै. विश्वनाथराव नळगे विद्यालयात पहाटे ६ वाजता जागतिक योगा दिनानिमित्त योग पहाट कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमांचा लाभ सर्व जनतेनी घ्यावे व दररोज योगा करून आपली शरीर व मन तंदुरुस्त ठेवावे, असे आवाहन भाजपा महिला मोर्चाच्या प्रदेश उपाध्यक्षा सौ. प्रणिताताई देवरे –चिखलीकर यांनी केले आहे.

# कॅडेट्सच्या भवितव्यासाठी एनसीसी अधिकाऱ्यांची भूमिका महत्त्वाची –ब्रिगेडियर अनुप बरबरे



**नांदेड (प्रतिनिधी)**– एनसीसी कॅडेटस्च्या भविष्यासाठी एनसीसी अधिकाऱ्यांची भूमिका व योगदान फार महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन छत्रपती संभाजी नगर ग्रुप हेडक्वॉटरचे ग्रुप कमांडर ब्रिगेडियर अनुप बरबरे यांनी केले. पीपल्स महाविद्यालयात आयोजित एका कार्यक्रमात ते बोलत होते. नुकताच पदभार स्वीकारून ब्रिगेडियर बरबरे यांनी ५२ महाराष्ट्र बटालियन अंतर्गत सायन्स व पीपल्स महाविद्यालयातील एनसीसी युनिटची पाहणी केली. शाळा व महाविद्यालयातील सर्व एनसीसी अधिकाऱ्यांना मार्गदर्शन केले. तसेच काही सूचनाही केल्या. महाविद्यालयाचे उप प्राचार्य डॉ. ए. एन. सिद्धेवाड, डॉ. सचिन पवार, डॉ. बालाजी कोंपलवार यांनी महाविद्यालयाच्या वतीने त्यांचे स्वागत केले. यावेळी ५२ महाराष्ट्र बटालियनचे सीओ के. दिलीप रेड्डी व त्यांचा स्टाफ, शाळा व महाविद्यालयातील एनसीसी ऑफिसर व कॅडेटस् उपस्थित होते. पीपल्स महाविद्यालयातील एनसीसी युनिटचे लेफ्टनंट डॉ मुकुंद कवडे यांनी कार्यक्रमाचे सुरेख सूत्रसंचालन करून उपस्थितांचे आभार मानले.

# कमरेला खंजर लावून बुलेटवर मोकाट फिरणाऱ्या दोघांना अटक

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)** – गुन्हा करण्याच्या तयारीत असलेल्या कमरेला खंजर लावून बुलेटवर लातूर फाटा ते कौठा दरम्यान फिरणाऱ्या दोघांना अटक करण्यात आली आहे. त्यांच्याकडून ग्रामीण पोलिसांनी दोन खंजर व बुलेट जप्त केली आहे.

नांदेड जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी अवैध शस्त्र बाळगुन फिरणारे लोकांवर कारवाई करण्याचे आदेश जिल्ह्यातील सर्व ठाण्यांना दिले आहेत. त्यानुसार मंगळवारी दि. १७ जून रोजी नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शोध पथकाचे पोउपनि मटवाड व त्यांच्या पथकाने मिळालेल्या माहितीनुसार लातूर फाटा ते कौठा दरम्यान खंजर बाळगून बुलेटवर कोणता तरी गुन्हा करण्याच्या तयारीत असलेल्या दोघांना मंगळवारी सायंकाळी साडेसात वाजता साई कमानीजवळ ताब्यात घेतले. एक लोखंडी खंजर व बुलेट (एमएच २६–बीवाय–२३४९) असा दीड लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करम्यात आला आहे. या कारवाईत पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर, पोउपनि ज्ञानेश्वर मटवाड, पोलीस अंमलदार पोहेको केंद्रे, पोको माने, पोकाँ पचलींग, पोको पवार, पोकाँ कल्याणकर यांनी सहभाग घेतला.



**मुखेड** : श्री धुंडा महाराज व श्री बंडा महाराज मठसंस्थांनची ४०० वर्षांची परंपरा असलेली देगलूर ते पंढरपूर पायी दिंडी यात्रेचे मंगळवारी मुखेड शहरात आगमन झाले. यावेळी दिंडी प्रमुख श्री गुरुराज महाराज देगलूरकर यांचे शहरातील भाविकांच्यावतीने उत्साहात स्वागत करण्यात आले. देगलूर ते पंढरपूर पायी दिंडी यात्रा बुधवारी मुखेड येथून मार्गस्थ झाली. या दिंडीत भाविक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. (छाया : हाफिजखान पठाण)

# लोहा तालुक्यातील २११ शिक्षकांनी घेतले इयता पहिली वर्गाचे प्रशिक्षण

**लोहा (प्रतिनिधी)**– इयता पहिली वर्गाचे तीन दिवसांचे प्रशिक्षण इंग्लिश स्कुल पारडी येथे संपन्न झाले. यात २११ शिक्षकांनी प्रशिक्षण घेतले.

जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था नांदेड व गटसाधन केंद्र पंचायत समिती लोहा यांच्या वतीने इयता पहिली वर्गाचे तीन दिवशीय प्रशिक्षण गटशिक्षणाधिकारी सतीश व्यवाहारे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले. समारोप शिक्षण विस्तार अधिकारी बाबुराव फसमले याच्या उपस्थितीत पार पडला. या वेळी पब्लिक स्कूल प्राचार्य जोगदंड, केंद्रप्रमुख विठ्ठल आचाणे, केंद्रप्रमुख जी.एस. मंगनाळे प्रमुख उपस्थित होते.जिल्हा परिषद शाळा व खाजगी अनुदानित शाळा इयत्ता पहिली ला शिकवणारे २११ शिक्षक प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.

तीन दिवसीय प्रशिक्षण नियोजनाप्रमाणें पार पडले सुलभक म्हणून आंबेकर, मारोती केंद्रे, श्रीमती वाडीकर, नागोराव जाधव, श्रीमती कदम, वाघमारे, तुतुरवाड, धोंड आदी सुलभकांनी कृती युक्त मार्गदर्शन केलं. प्रशिक्षणार्थी यांनी खूप चांगला प्रतिसाद दिला. त्याचबरोबर प्राथमिक माध्यमिक पब्लिक स्कूलचे सहकार्य लाभले.

समारोप कार्यक्रमाचे सुत्रसंचालन जी. वाय. वाघमारे केले. आभार मारोती केंद्रे यांनी आभार मानले. प्रशिक्षण समन्वयक संजय अकोले यांनी नियोजन केले.

# उत्कृष्ट केंद्रस्तरीय अधिकारी म्हणून इम्रान खान यांचा नवी दिल्लीत सन्मान

**किनवट (प्रतिनिधी)**– येथील जवाहेरुल उलूम उर्दू विद्यालयाचे सहशिक्षक व किनवट विधानसभा मतदारसंघातील यादी भाग क्रमांक १८१ चे केंद्रस्तरीय अधिकारी इम्रान करीम खान यांचा उत्कृष्ट बीएलओ म्हणून नवी दिल्लीत भारत आंतरराष्ट्रीय लोकशाही व निवडणूक व्यवस्थापन संस्था येथे सन्मान करण्यात आला.




भारत निवडणूक आयोगाच्यावतीने दि.१२ व १३ जून रोजी महाराष्ट्र, आंध्रप्रदेश, कर्नाटक आणि उडीसा या राज्यातील निवडणूक अधिकाऱ्यांसाठी नवी दिल्लीत प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते. महाराष्ट्रातून एकूण १३२ बीएलओ अधिकारी या प्रशिक्षणात सहभागी झाले होते. यात नांदेडचे प्रतिनिधीत्व किनवट येथील इमरान खान यांनी केले. त्यांनी बीएलओ ॲप अधिक सुलभ व प्रभावी करण्याबाबत तसेच नवीन नाव नोंदणी करण्यासंदर्भात महत्त्वपूर्ण सल्ला दिला. त्यांच्या या सल्ल्याची निवडणूक आयोगाने दखल घेतली आणि ईम्रान खान यांच्या शॉर्ट व्हिडिओ आयोगाने आपल्या वेबसाईटवरून प्रसिद्ध केले. राज्याचे सहायक मुख्य निवडणूक अधिकारी किरण शार्दुल यांच्या हस्ते इम्रान खान यांचा विशेष प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. दिल्ली येथील गौरव करण्यात आल्याबद्दल इमरान खान यांचे किनवट तहसीलच्यावतीने अभिनंदन करण्यात आले.

# पानभोसीच्या शाळेत पाल्यांना प्रवेश देणाऱ्या पालकांची घर व नळपट्टी माफ करणार –सरपंच राजश्री भोसीकर



**लोहा (प्रतिनिधी)**– पानभोसी येथील जि.प. शाळेत पहिल्याच दिवशी सरपंच राजश्री भोसीकर यांनी पालकांना सुखद धक्का दिला. जिल्हा परिषदेच्या शाळेत पाल्यांना टाकणाऱ्या पालकांची घरपट्टी व नळपट्टी माफ करण्याचा निर्णय घेतला आहे.

कार्यक्रमाच्या प्रारंभी सरस्वती मातेचे व सावित्रीबाई फुलेच्या प्रतिमेचे पूजन सरपंच सौ.राजश्री भोसीकर यांच्या हस्ते करण्यात आले. पहिल्या वर्गातील विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आला. सर्व शिक्षक व विद्यार्थ्यांचा ग्रामपंचायतीच्या वतीने गुलाब पुष्प देऊन विशेष सत्कार करण्यात आला. तसेच मुला–मुलींची आरोग्य तपासणी करण्यात आली. मुला–मुलींना पोशाख व पाठ्यपुस्तके वाटप करण्यात आली. शुद्ध पाणी व इतर साहित्य पुरविण्यात आले. तसेच वृक्ष लागवड करण्यात आली

यावेळी कंधार तालुका राष्ट्रवादी काँग्रेस कमेटीचे अध्यक्ष मनोहर पाटील भोसीकर, शालेय समितीचे अध्यक्ष परमेश्वर घोडके, मुख्याध्यापिका सौ. देशमुख, सहशिक्षिका सौ.कुलकर्णी, श्रीमती सालमोटे, श्रीमती उत्तरवार, श्रीमती नागरगोजे, वैजेनाथ गर्जे, ग्रामसेवक देवकाते, तलाठी देवके, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. केंद्रेकर, हंबर्डे आणि गावातील प्रतिष्ठित नागरिक व पालकांची उपस्थिती होती.

# अवैध कत्तलीसाठी गोवंश नेणाऱ्या २ आरोपींना अटक; वाहनासह सात लाखांचा मुद्देमाल जप्त

**नांदेड (प्रतिनिधी)**– अवैधरित्या कत्तलीसाठी गोवंशाची पिकअप वाहनातून वाहतूक करणाऱ्या २ आरोपींना माळाकोळी पोलिसांच्या पथकाने अटक केली. त्यांच्याकडून ७ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.



पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी अवैध व्यवसायांवर कारवाई करण्याबाबत सर्व पोलीस ठाण्यांच्या अधिकाऱ्यांना आदेश दिले होते. त्यानुसार १७ जून रोजी माळाकोळी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक महेश मुळीक हे पथकासह पथक पेट्रोलिंग करीत होते. मरडसगाव–बनवस जाणाऱ्या रस्त्यावरील लव्हराळ गावाच्या फाट्यावर एका पांढऱ्या रंगाच्या पिकअप वाहनातून ५ गोवंशाची वाहतूक होत असल्याची गोपनीय माहिती मिळाली.

पथकाने त्या ठिकाणी छापा टाकाला. त्यात वाहनात गोवंशाचे पाय क्रूरतेने बांधून चारापाणी न केल्याचे निदर्शनास आले. यावेळी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सिल्लोड तालुक्यातील ईदगाह नगर गल्ली येथील आरोपी शेख मेहबूब शेख सुब्रतो व नाशिक जिल्ह्यातील मालेगाव तालुक्यातील नागचाप झोपडपट्टी येथील आरोपी चालक शेख इफ्तेहार शेख सत्तार यांना ताब्यात घेण्यात आले. त्यांनी सदर गोवंश कत्तलीकरिता घेऊन जात असल्याचे सांगितले. पथकाने ५ गोवंश व पिकअप वाहन असा एकूण सात लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. उपरोक्त दोन्ही आरोपींना माळाकोळी पोलीस ठाणे येथे आणून त्यांच्यावर कारवाई करण्यात आली.

# ड्रेनेजची गळती आणि मनपाचे दुर्लक्ष, सोमेश कंपाउंडमधील नागरिक त्रस्त

## रोगराईचा धोका वाढला, नागरिक आंदोलनाच्या तयारीत

**नांदेड (प्रतिनिधी)**– नांदेड शहरातील सोमेश कंपाउंड परिसर सध्या दुर्गंधी आणि घाणीच्या विळख्यात सापडला आहे. लाखो रुपये खर्चुन काही दिवसांपूर्वी ड्रेनेज लाईन टाकण्यात आली असतानाही, योग्य नियोजनाचा अभाव आणि मनपाचे अक्षम्य दुर्लक्ष यामुळे या परिसरात ड्रेनेजची गळती होऊन सांडपाण्याचे रस्त्यावर थैमान सुरू आहे. यामुळे परिसरात उघड्यावर साचलेले सांडपाणी आणि पसरलेली दुर्गंधी नागरिकांचे आरोग्य धोक्यात आणत आहे.

या भागातील अनेक रहिवासी ताप, अंगदुखी, त्वचारोग व उडत्या आजारांनी त्रस्त झाले असून, त्यांची रोजची दिनचर्या विस्कळीत झाली आहे. विशेष म्हणजे महानगरपालिका क्षेत्रात सध्या केंद्र सरकारच्या अमृत २.० योजनेअंतर्गत ड्रेनेज व रस्त्यांच्या कामासाठी मोठा निधी खर्च केला जात आहे. मात्र, प्रत्यक्षात या योजनांचा फायदा नागरिकांपर्यंत पोहोचत नाही, हे सोमेश कंपाउंडच्या स्थितीवरून स्पष्ट होते.


या भागात नव्याने टाकलेल्या ड्रेनेज लाईनचे कनेक्शन काही घरांना दिलेच गेले नाही, तर काही ठिकाणी काम अर्धवट सोडण्यात आले. परिणामी सांडपाणी थेट रस्त्यावर वाहत असून, त्याचा परिणाम शेजारील परिसरावर होत आहे.

नागरिकांनी यासंबंधी नांदेड महापालिकेकडे वेळोवेळी तक्रारी केल्या आहेत. पण कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नाही. याबाबत नागरिकांनी सांगितले की, आम्ही वारंवार तक्रारी करून थकलो आहोत. सध्या उन्हाचे दिवस आहेत. पावसाळा सुरु झाला की परिस्थिती आणखी बिकट होणार आहे. प्रशासन वेळेत जागे झाले नाही, तर आम्हाला आंदोलनाशिवाय पर्याय उरणार नाही. या समस्येवर तात्काळ लक्ष न दिल्यास संपूर्ण परिसरात गंभीर आरोग्यसंकट उभे राहू शकते. त्यामुळे महापालिका प्रशासनाने या भागातील ड्रेनेज यंत्रणा त्वरित दुरुस्त करून, नागरिकांना दिलासा द्यावा, अशी मागणी या भागातील त्रस्त नागरिकांनी केली आहे.

फॅशन | संसार | सौंदर्य

# सखी

# पावसाळ्यात नखांची काळजी



पावसाळा हा बाकी कितीही रम्य असला तरीही त्वचेसाठी तो काहीसा कठोरच असतो. कारण, अर्थात या दिवसांमध्ये बॅक्टेरियल आणि फंगल इन्फेक्शन्सचा धोका तुलनेनं जास्त असतो. त्यामुळे या दिवसांमध्ये आपल्या आरोग्याची विशेष काळजी घेणं आवश्यक ठरतं. दरम्यान, आरोग्य आणि स्वच्छतेच्या बाबतीत खरंतर आपण शक्य तितकी काळजी घेण्याचा प्रयत्न करतच असतो. मात्र, तरीही आपलं एखाद्या लहानशा अवयवाकडे वारंवार दुर्लक्ष होतं. तसेच पावसाळयात शरीराच्या इतर अवयवांप्रमाणेच आपल्या नखांची स्वच्छता टिकवून ठेवणं फार महत्त्वाचं आहे. तसं न केल्यास आपल्याला त्याचे प्रतिकूल परिणाम दिसू शकतात. म्हणूनच पावसाळ्यात नखांची स्वच्छता आणि सौंदर्य हे दोन्ही कसं साधायचं ? याबाबत आज ५ टिप्स जाणून घेणार आहोत...

- कोरडी ठेवा : आपली नखं ही नेहमी कोरडी राहतील यासाठी विशेष काळजी घ्या. विशेषतः पायांची नखं. पावसाळ्यात आपल्या पायांचा सतत पाण्याशी किंवा अस्वच्छ पाण्याशी संपर्क येत असतो. त्यामुळे ही नखं खराब होण्याची शक्यता अधिक असते. सततच्या दमटपणामुळे या जागी मृत त्वचेच्या पेशी आणि संसर्गजन्य जीवाणू तयार होऊन घाण जमा होते. त्यामुळे, ती जितकी कोरडी राहतील तितकं योग्य. त्याचप्रमाणे, पावसाळ्यात बाहेर पडताना खुले शूज, फ्लोटर्स किंवा चप्पल घाला. घरी परत आल्यावर पाय स्वच्छ धुवून नखं व्यवस्थित कोरडी करा.



- अँटीफंगल पावडर : पावसाळ्यात स्वच्छता राखण्यासाठीच्या अत्यावश्यक गोष्टींमध्ये अँटीफंगल पावडरचा देखील समावेश करा. संसर्ग टाळण्यासाठी दिवसातून एकदा ही पावडर आपल्या नखांवर लावा. अँटीफंगल पावडर नसल्यास त्याऐवजी तुम्ही जेनेरिक टॅल्कम पावडर किंवा स्प्रे डिओडोरंट वापरू शकता.
- ट्रिमिंग : आपली नखं वेळच्यावेळी कापा. कारण लांब नखं ही पाणी आणि आर्द्रतेमुळे सर्व जीवाणूंसाठी एक सुरक्षित जागा बनू शकतात. शिवाय, ओलसरपणामुळे आपली नखं किंचित मऊ देखील होतात. त्यामुळे ती सहज वाकण्याची पर्यायाने मोडण्याची शकता जास्त असते. म्हणून, तुम्ही नख ही लहान आणि सुव्यवस्थित ठेवा.
- स्वच्छतेसाठी टोकदार साधनं टाळा : नखांच्या आतल्या बाजूच्या स्वच्छतेसाठी अनेक स्त्रिया या लांब आणि टोकदार साधनांचा वापर करतात. मात्र, ही एक चुकीची पद्धत आहे. यामुळे तुमची नखं आणि नखांच्या त्वचेमधलं अंतर वाढू शकतं. पावसाळ्यात ओलाव्यामुळे संसर्गाच्या अनेक समस्या उदभवू शकतात. सोबतच तुमच्या नखांच्या त्वचेला इजा होण्याचा देखील धोका आहेच. म्हणूनच टोकदार साधनं न वापरता स्वच्छतेसाठी तुम्ही नेल ब्रश वापरू शकता.
- बेस कोट वापरा : नेल पॉलिश लावण्यापूर्वी बेस कोट वापरा. हा लेअर तुमची नखं कमकुवत होण्यापासून रोखेल. तसेच नेल पॉलिश रिमूव्ह करताना नखं आणि क्यूटिकल्स स्मूथ ठेवण्यासाठी चांगल्या दर्जाचं नेल रिमूव्हर वापरा.

# पावसाळ्यात केसांची काळजी घेणारे ४ तेल



पावसाळ्यात केस गळणे आणि कोंडा होण्याच्या समस्येने लोक त्रस्त असतात. या ऋतूतील आर्द्रतेमुळे हा त्रासही जास्त वाढतो. आर्द्रतेमुळे लोक केसांना तेल लावणे बंद करतात पण असं मुळीच करू नका. पावसाळा असल्याने केसांना तेल लावणे कधीही थांबवू नका. खरं तर, या ऋतूतही, रोजच्या तेलामुळे तुमचे केस निरोगी आणि फ्रिज-फ्री राहू शकतात. पावसाळ्यात केसांना लावलेले तेल तुमच्या केसांमधील खाज आणि ड्राई स्कैल्पपासून सुटका करते. याशिवाय तुमच्या केसांमधील कोंडा आणि केसगळतीदेखील भरपूर प्रमाणात कमी होते. त्यामुळे पावसाळ्यात देखील केसांना पोषण मिळण्यासाठी तेल लावले पाहिजे. तर जाणून घ्या पावसाळ्यात केसांना कोणते तेल चांगले आहे आणि त्याचा वापर कसा करावा...

- खोबरेल तेल : खोबरेल तेल तुमच्या केसांसाठी सर्वोत्तम तेलांपैकी एक आहे. त्यात आवश्यक फॅटी ॲसिडस् आणि प्रथिने असतात जे तुमच्या टाळूचे खोलवर जाऊन पोषण करतात आणि तुमचे केस मजबूत करतात. नारळाचे तेल तुम्हाला कोरड्या आणि कुरळ्या केसांचा सामना करण्यास देखील मदत करू शकते, जी पावसाळ्यात एक सामान्य समस्या आहे. याशिवाय खोबरेल तेल तुमचे केस फ्रिज-फ्री देखील ठेवते. यामुळे आठवड्यातून २ वेळा खोबरेल तेल यामुळे या तेलाचा आठवड्यातून २ वेळा तरी केसांना वापर केल्यास, याचा चांगला फायदा मिळतो.
- मोहरीचे तेल : मोहरीच्या तेलाने मसाज केल्याने त्वचेवर आणि टाळूवर रक्त प्रवाह सहज वाढतो. केसांवर मोहरीचे तेल वापरावे कारण त्यात अँटीबॅक्टेरियल आणि अँटी फंगल गुणधर्म असतात. यासाठी थोडं मोहरीचं तेल गरम करा आणि त्यानं टाळूला मसाज करा. आपले केस कोमट टॉवेलने काही वेळ झाकून ठेवा आणि थंड पाण्याने धुवा. याने तुमच्या



गरम करून केसांना लावा आणि चांगला मसाज करा.

- ट्री हेअर ऑइल : ट्री हेअर ऑइल पावसाळ्यात केसांना आवश्यक असते. कारण त्यात बॅक्टेरियाच्या वाढीस प्रतिबंध करणारा पदार्थ आणि दाहक-विरोधी गुणधर्म आहेत. ट्री हेअर ऑइल त्याच्या अँटीव्हायरल गुणधर्मांसाठी प्रसिद्ध आहे, जे तुमच्या त्वचेची आणि केसांची काळजी घेऊ शकते. तसंच हे कोरड्या आणि निर्जीव केसांवर सहज उपचार करते. याशिवाय . ट्री हेअर ऑइल लावल्याने तुमच्या केसांमधील कोंडा किंवा टाळूवरील खाज बऱ्याच प्रमाणात कमी होते. केसांना नक्कीच चांगले पोषण मिळेल. तसंच केसांसंबंधित समस्याही नाहीशा होतील.
- बदाम तेल : बदामाच्या तेलामध्ये व्हिटॅमिन ई मोठ्या प्रमाणात असते आणि ते त्वचा आणि केसांसाठी देखील खूप चांगले आहे. टाळूवर बदामाचे तेल वापरल्याने केसांचे कूप मजबूत होऊ शकतात. तसंच कोरडे केसांची समस्या बदाम तेलामुळे भरपूर प्रमाणात कमी होते. तुमच्या टाळूची मसाज करण्यासाठी तुम्ही बदामाचे तेल ऑलिव्ह ऑईलमध्ये मिसळून लावू शकता, ज्यामुळे तुमचे केस निरोगी, हायड्रेटेड आणि मऊ होतील.

# ‘अशी’ घ्या केसांची विशेष काळजी !

पावसाळा ऋतु लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांना आवडतो. विशेषतः मुलींना या ऋतूचा मनमोकळा आनंद घ्यायचा असतो. पण यासोबतच त्यांना त्यांच्या केसांची आणि त्वचेची चिंता देखील असते. कारण पावसात केस खराब होण्याची शक्यता जास्त असते. यामुळे पावसाळ्यात केसांची विशेष काळजी घ्यावी लागते. या ऋतूत कमीत कमी हेअर प्रोडक्ट्स वापरा असे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. पावसाळ्यात आपल्या केसांची काळजी कशी घ्यावी याबाबत आपण जाणून घेणार आहोत. पावसाळ्यात केसांच्या होणाऱ्या समस्या आणि त्यावर उपाय याबाबत जाणून घेऊया...

## पावसाळ्यात केसांचे संरक्षण कसे करावे ?

- पावसाळ्यात केसांमध्ये कमीत कमी उत्पादनांचा वापर करा. आपले केस स्वच्छ ठेवा आणि केस धुतल्यानंतर कंडिशनर लावा.
- केस धुताना प्रत्येक वेळी कंडिशनर वापरा, पण ते टाळू आणि मुळांना लावण्याऐवजी केसांनाच लावा. यामुळे तुमचे केस गळणार नाही.
- केस रोज धुवा आणि स्वच्छ ठेवा. केस धुतल्यानंतर थोडे कोरडे झाल्यावर सीरम लावा. यामुळे तुमच्या केसांचा ओलावा टिकून राहील आणि केस तुटणार नाहीत.
- रोगप्रतिकारक शक्तीचा केसांवर मोठा प्रभाव पडतो. त्यामुळे प्रोटीनयुक्त पदार्थ खा. तसंच अधिक फळे , भाज्या खा आणि भरपूर पाणी प्या.
- पावसाळ्यात केसांना कोमट तेलाने मसाज करा, कारण ते केसांना पोषण देते.
- पावसाळ्यात हेअर ड्रायर वापरणे सहसा टाळा. परंतु, आवश्यक असलेल्यास फक्त केस कोरडे करा आणि ड्रायर टाळूपासून किमान साडेपाच इंच दूर ठेवून वापरा.
- केसांवर केमिकलयुक्त उत्पादने वापरू नका, म्हणजेच केस सरळ आणि हायलाइट करणे टाळा.
- पावसाळ्यात केस ओले होणार नाहीत याची काळजी घ्या. पावसाच्या



सुरुवातीच्या दिवसांमध्ये पाण्यात , हवेत धूलिकण असतात, ज्यामुळे केस कमकुवत आणि निर्जीव होऊ शकतात.

# पावसाळ्यात केसांना कलर करताना...

पावसाळ्यात केसांची विशेष काळजी घ्यावी लागते. कारण या ऋतूत केस गळणे, कोंडा होणे आणि केसांना फाटे फुटणे या समस्या खूप वाढतात. अशा परिस्थितीत जर तुम्ही या ऋतूत केस कलर करण्याचा विचार करत असाल तर काही गोष्टींची काळजी घेणे आवश्यक आहे. या ऋतूमध्ये केसांना कलर करण्याआधी काही खबरदारी घेणे आवश्यक आहे. कारण या ऋतूमध्ये केस अधिक खराब होतात. या व्यतिरिक्त या ऋतूमध्ये केसांचा रंगही चांगला चढत नाही. अशा परिस्थितीत केसांना कलर करताना आपण कोणत्या गोष्टी लक्षात ठेवायला हव्यात हे जाणून घेऊया...

## या गोष्टी लक्षात ठेवा...

- हेअर कलरच्या गुणवत्तेकडे लक्ष द्या : पावसाळ्यात केसांना कलर करण्याआधी तुम्ही निवडत असलेल्या रंगाचा दर्जा चांगला आहे की नाही याकडे लक्ष द्या. यासाठी केसांना कलर लावण्याआधी पॅच टेस्ट करा कारण या कलरच्या वापरामुळे केसांचे नुकसान होऊ शकते.
- केस कलर करण्याआधी केसांना तेल लावा : केस कलर करण्याच्या एक ते दोन दिवस आधी केसांना तेलाने चांगले मसाज करा कारण तेल केसांना पोषण देते आणि त्यांना मजबूत बनवते. त्यामुळे केस खराब होत नाहीत आणि कलर केल्यानंतर कोरडेही होत नाहीत. त्याचवेळी, पावसाळ्यात केसांची चमक निघून जाते, त्यामुळे केसांना तेलाने मसाज करणे आवश्यक आहे.
- डोळ्यांना होणाऱ्या नुकसानाकडे लक्ष द्या : पावसाळ्यात त्वचेसोबतच डोळ्यांना संसर्ग होण्याचा धोकाही वाढतो. अशा परिस्थितीत, संसर्गाच्या वेळी डोळ्यात कलर जाता कामा नये. कारण केसांचा रंग तुमच्या डोळ्यांचा संसर्ग अनेक पटींनी वाढवू शकतो.

# ‘या’ लिपस्टिक शेड्स करा ट्राय !

पावसाळ्यात आद्रता जास्त असते. त्यामुळे खूप घाम येतो. अशा परिस्थितीत जास्त मेकअप वापरल्यास सुंदर दिसण्याऐवजी तुमचा लूक खराब करू शकतो. पावसाळ्यात हलका मेकअप करणे जास्त चांगले आहे आणि काही विशेष प्रकारच्या लिपस्टीक तुमच्या मेकअप किटमध्ये ठेवू शकता. आज आम्ही तुम्हाला अशा लिप्स शेड्स बाबत सांगणार आहोत ज्या वापरून तुम्ही पावसाळ्यातही तुमचा लूक चांगला दिसेल...

- बेरी टोन : पावसाळ्यात बेरीच्या वेगवेगळ्या शेड्स जसे की डीप रेड, प्लम किंवा क्रॅनबेरी असे रंग निवडा. हे शेड्स जवळजवळ प्रत्येक त्वचेच्या टोनला सूट देतात आणि तुमचा लूक सुधारण्यासाठी मदत करतात.
- रोज पिंक : सॉफ्ट रोज पिंक शेड्स तुम्हाला सुंदर दिसण्यासोबतच तरुण दिसण्यासाठी देखील मदत करतात. ते ओठांना नॅचरल लूक देतात, सर्वात चांगली गोष्ट म्हणजे तुम्ही त्यांना कॅज्युअल आणि फॉर्मल लूकमध्ये वापरू शकता.
- कोरल शेड : चमकदार कोरल शेड्स पावसाळ्याच्या दिवसामध्ये हटके लूक देण्यासाठी मदत करतात. या रंगामुळे तुम्ही तुमच्या वास्तविक वयापेक्षा तरुण दिसता आणि तुमचे सौंदर्य वाढवतात.
- न्यूड शेड्स : जर तुम्हाला गडद लिपस्टिक वापरणे आवडत नसेल तर तुम्ही न्यूड शेड्स निवडू शकता. न्यूड शेड्सही प्रत्येक आउटफिटसोबत वापरता येतात.
- मोव्ह शेड : गुलाबी आणि जांभळ्या रंगाची शेड असलेली लिपस्टिक ही एक दिवसभरच्या लूकसाठी योग्य पर्याय आहे. बरं, तुम्ही रात्रीच्या पार्टीसाठी किंवा लग्नासाठी या शेड्स वापरून पाहू शकता.



# पावसाळ्यात चेहऱ्यावर मुरूम ?

पावसाळ्यात त्वचेची खूप काळजी घ्यावी लागते. अन्यथा चेहऱ्यावर अनेक मुरुम येतात किंवा चेहरा खूप तेलकट दिसू लागतो. त्वचेची योग्य काळजी घेऊनही चेहऱ्यावर मुरुम येतात. याचा अर्थ तुम्ही काळजी घेताना कुठेतरी चुकत आहात. ज्यामुळे चेहऱ्यावर मुरुम येण काही थांबत नाही. अशावेळी तुम्ही त्वचेची काळजी घेताना कुठे चुकत आहात आणि मुरुपांपासून कशी मुक्तता मिळवायची जाणून घ्या...

- त्वचेवर चुकीचे केअर प्रोडक्ट्स वापरणे : स्कीन केअर प्रोडक्ट वापरण्यापूर्वी, आपली त्वचा तेलकट, कोरडी किंवा सामान्य यापैकी कोणती आहे हे नीट तपासून घ्या. जर तुम्ही त्वचेनुसार चुकीचे स्कीन प्रोडक्ट वापरत असाल तर तुमची त्वचा खराब होऊ शकते. तसेच चेहऱ्यावर मुरुम येऊ लागतात.



- हानिकारक मेकअप प्रोडक्ट वापरणे : मेकअप प्रोडक्ट चेहऱ्याचे सौंदर्य वाढवण्यासाठी वापरले जातात. पण मेकअपचे अनेक प्रोडक्ट बाजारात आहेत ज्यामध्ये केमिकलचे प्रमाण खूप जास्त असते. यामुळे चेहऱ्यावर बराच वेळ मेकअप ठेवल्याने योग्य ऑक्सिजन मिळत नाही यामुळेही चेहऱ्यावर मुरुम येतात.
- चेहऱ्यावर चुकीचे क्लींझर वापरणे : चेहऱ्याच्या त्वचेनुसार योग्य क्लींझरची निवड करणे देखील खूप महत्वाचे आहे, अन्यथा चेहऱ्याची त्वचा खराब होऊ शकते. तुम्ही फोम क्लींझर वापरू नका, तसेच स्किन एक्सफोलिएट करण्यासाठी क्लींझर वापरू नये. असे केल्याने त्वचेला भोगा पडण्यास सुरुवात होते. जर तुम्हाला सर्वोत्तम परिणाम मिळवायचा असेल, तर फक्त वॉटर बेस्ड क्लींझर लावा.
- फक्त वाइप्सच्या मदतीने मेकअप काढा : चेहऱ्यावरील मेकअप काढण्यासाठी वाइप्सचा वापर करा, पण त्यानंतर चेहरा स्वच्छ करण्यासाठी तुम्ही फेसवॉश वापरू शकता. कारण यामुळे चेहऱ्यावरील सर्व प्रकारचे केमिकल्स निघून जातील.

# संतपीठातील विद्यार्थी भागवत धर्म जगभरात पोहोचवतील –मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## संत तुकाराम महाराज संतपीठातील कलादालन व सभागृहाचे लोकार्पण



**पुणे (प्रतिनिधी)** – आपली संस्कृती, संतांचे विचार व परंपरा जगापर्यंत पोहोचविण्यासाठी आधी ते पुढील पिढीपर्यंत पोहोचविणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने जगद्गुरू संत तुकाराम महाराज संतपीठ येथे शिक्षण, प्रशिक्षण देण्यात येणार आहे. या विद्यापीठात शिकणारा विद्यार्थी भागवत धर्म जगभरात पोहोचवेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

श्रीक्षेत्र टाळगाव, चिखली येथे वारकरी संप्रदायासोबत अत्याधुनिक शिक्षण देणारी शैक्षणिक संस्था विकसित केलेल्या जगद्गुरू संत तुकाराम महाराज संतपीठाच्या कलादालन व सभागृहाच्या लोकार्पण प्रसंगी ते बोलत होते.

यावेळी खासदार श्रीरंग बारणे, आमदार महेश लांडगे, अमित गोरखे, पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्त शेखर सिंह, संतपीठाचे संचालक डॉ. सदानंद मोरे, चिंतन समिती, संतपीठ समितीचे पदाधिकारी तसेच पालक प्रतिनिधी व विद्यार्थी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, महाराष्ट्राला मोठी संतपरंपरा लाभलेली आहे. संतपरंपरा जपण्याचे काम संतपीठात होणार आहे. या ठिकाणाला वैश्विक स्वरुप देण्याचे काम करण्यात आले असून येथे संपूर्ण संतसाहित्य 'सीबीएससी' अभ्यासक्रमाच्या माध्यमातून संस्कृत, मराठी, हिंदी व इंग्रजी या चारही भाषांमधून शिकविले जाणार आहे. विविध वादनाचे वाजविण्याचे प्रशिक्षणही याठिकाणी देण्यात येणार आहे.

संतपीठाने तयार केलेल्या यापुढील संकल्प आराखड्यानुसार पंढरपूर व आळंदी येथे उभारण्यात येणाऱ्या संतपीठाला शासन पूर्णपणे मदत करेल. सगळ्या ठिकाणची संतपीठे एकमेकांना पूरक बनविण्यात येतील. नवीन शैक्षणिक धोरणामुळे मराठी भाषेला ज्ञानभाषा बनविण्याचा मार्ग खुला झाला असून मराठीला वैश्विक भाषा, ज्ञानभाषा व अर्थकारणाची भाषा बनविण्याचे दालनही खुले झाले आहे. हे धोरण महाराष्ट्र शासनाने स्वीकारले असून सर्व शाळांमध्ये मराठी भाषा अनिवार्य करण्यात आली आहे. आपल्या भाषेचा अभिमान बाळगताना इतर भारतीय भाषेचा तिरस्कार करणे योग्य नाही असेही मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

प्रारंभी जगद्गुरु संत तुकाराम महाराज संतपीठ, चिखली येथे संत मल्हारपंत कुलकर्णी गायन कक्ष , संत सोनबा ठाकुर पखवाज कक्ष , पंडीत अरविंद मुळगावकर तबला कक्ष तसेच आलीजाबहाद्दर ह.भ प महादजी शिंदे सभागृहाचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते लोकार्पण व पाठ्यपुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने वारकरी संप्रदायासोबत अत्याधुनिक शिक्षण देणारी शैक्षणिक संस्था विकसित करण्याच्य महत्वाकांक्षी उद्देशाने टाळगाव चिखली येथे २३ कोटी ५४ लाख खर्चातून 'जगद्गुरू संत तुकाराम महाराज संतपीठ' विकसित केले आहे. यामध्ये तळमजला तसेच ५ मजले असे इमारतीचे नियोजन करण्यात आले असून त्याचे एकूण बांधकाम क्षेत्र १३ हजार १६१ चौरस मीटर आहे. या इमारतीमध्ये ५५ वर्गखोल्या, ९ कार्यालये, ४० इतर खोल्या ज्यामध्ये प्रयोगशाळा, संगणक कक्ष, सभागृह, संगीत तथा वाद्य कक्ष आहेत. प्रत्येक मजल्यावर स्वच्छतागृहे, विद्यार्थ्यांना खेळण्याकरिता विस्तीर्ण मैदान आदी सुविधा आहेत.

# देशातील पहिला सृजनशील, सांस्कृतिक महाराष्ट्र रेडिओ महोत्सव मुंबईत

## आशा रेडिओ पुरस्काराचे शनिवारी वितरण

**मुंबई (प्रतिनिधी)** – जागतिक संगीत दिनाचे औचित्य साधून २१ जून रोजी सांस्कृतिक कार्य विभागामार्फत यावर्षी देशातील पहिला सृजनशील आणि सांस्कृतिक महाराष्ट्र रेडिओ महोत्सव व महाराष्ट्र आशा रेडिओ गौरव पुरस्कार २०२५ चे आयोजन करण्यात आले असल्याची घोषणा सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांनी पत्रकार परिषदेत केली.

१ जून रोजी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान सभागृह येथे दु. २.०० वाजता हा सोहळा आयोजित करण्यात आला असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत १२ रेडिओ पुरस्काराचे वितरणही करण्यात येणार आहे.

रेडिओ क्षेत्राला गौरव प्राप्त करुन देणारा हा ऐतिहासिक उपक्रम आहे. राज्याची सांस्कृतिक, ऐतिहासिक परंपरा जपण्याचे काम रेडिओमार्फत झाले आहे. विविध क्षेत्रातील तज्ज्ञांच्या मुलाखती रेडिओमार्फत जतन करण्यात आल्या आहेत. देशाच्या स्वातंत्र्यापासून ते महाराष्ट्राच्या निर्मितीपर्यंत सर्व ऐतिहासिक घटनांचा रेडिओ साक्षीदार आहे. महाराष्ट्रात आकाशवाणीनेही भूमिका निभावली आहे. तसेच खासगीकरण आणि आधुनिकीकरणाच्या काळात खासगी एफएम चॅनेल आणि कम्युनिटी रेडिओनेही भूमिका अधोरेखित केली आहे. मराठी संगीत, गाणी, शास्त्रीय संगीत जपणारे, उदयमशील आणि सृजनशील रेडिओ चॅनलला प्रोत्साहन मिळावे यासाठी हे पुरस्कार प्रदान करण्यात येत आहेत. मराठी निवेदक, मराठी अभिनेते, संगीतकार, गीतकार, लेखक, तंत्रज्ञ, संपादक यांना एक व्यासपीठ मिळावे. त्यांच्या माध्यमातून मराठी कला, साहित्य, संस्कृतीचे जतन करण्यात यावे. तसेच ज्या रेडिओच्या माध्यमातून केवळ मनोरंजन नाही तर प्रबोधन, राजकारण, सामाजिक जाणीव यासाठी भरीव योगदान दिले जात आहे. त्यांना या माध्यमातून योग्य सन्मान देण्यासाठीचा हा प्रयत्न असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

प्रदान करण्यात येणाऱ्या १२ रेडिओ पुरस्कारात आशा रेडिओ गौरव पुरस्कार हा संगीत क्षेत्रातील दिग्गज असलेल्या 'महाराष्ट्र भूषण आशा भोसले' यांच्या नावाने देण्यात येणार आहे. आशा भोसले यांचे संगीत क्षेत्रातील अमूल्य योगदान लक्षात घेता हे नाव देण्याचे शासनाने निश्चित केल्याचे ॲड. आशिष शेलार यांनी सांगितले.

# राज्यपालांच्या उपस्थितीत होणार सर्व कुलगुरुंची सामायिक बैठक

**मुंबई (प्रतिनिधी)**– उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसह राज्यपाल तथा राज्य विद्यापीठांचे कुलपती सी. पी. राधाकृष्णन यांची राजभवन येथे भेट घेऊन विविध विषयांवर चर्चा केली. विद्यापीठांशी संबंधित विविध विषयांवर चर्चा करण्यासाठी आपण लवकरच सर्व पारंपरिक विद्यापीठांची संयुक्त बैठक आयोजित करू तसेच राज्याच्या कृषिमंत्र्यांसह राज्यातील कृषी विद्यापीठांना भेट देऊन तेथील संशोधनाची विस्तृत माहिती घेऊ, असे राज्यपालांनी बैठकीत सांगितले.

या बैठकीत विद्यापीठांमधील शिक्षक व शिक्षकेत्तर पदांवरील भरती, विद्यापीठांमधील वैधानिक पदांची भरती, उच्च व तंत्रशिक्षण विभागाची पहिल्या १०० दिवसांमधील उपलब्धी, शिकाऊ उमेदवारी संलग्न पदवी अभ्यासक्रम, कौशल्य विद्यापीठाशी सहकार्य, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी, विद्यापीठांमधील प्रशासन सुधार, सर्व पदवी अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांसाठी आंतरवासिता आदी विषयांवर चर्चा झाली.

उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव बी वेणुगोपाल रेड्डी, राज्यपालांचे सचिव डॉ प्रशांत नारनवरे, उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर, तंत्र शिक्षण संचालक डॉ. विनोद मोहितकर, राज्यपालांचे उपसचिव एस. राममूर्ती आदी उपस्थित होते.

# वॉटर पार्कमधील झुला तुटून एकाचा मृत्यू

**सोलापूर (प्रतिनिधी)** – अकलूज येथील सयाजीराजे वॉटर पार्कमधील फिरत्या पाळण्यामध्ये भीषण अपघात घडला. एक पाळणा अचानक निसटून पडल्याने, त्यामधील तिघांना जबरदस्त मार बसल्याची प्राथमिक माहिती समोर आली होती. मात्र त्यांपैकी एकाचा उपचारादरम्यान दुर्दैवी मृत्यू झाला असल्याचे सूत्रांकडून कळते.

या दुर्घटनेत भिगवण येथील तुषार धुमाळ नावाचे व्यावसायिक अत्यंत गंभीर जखमी झाले होते. धुमाळ यांना तात्काळ अकलूज येथील रुग्णालयात उपचारासाठी हलविण्यात आले होते. मात्र, उपचारापूर्वीच त्यांचे निधन झाल्याची माहिती आहे. दरम्यान, अपघातातील इतर दोन जखमींवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

# 'बीडीओं'च्या अंगावरच उधळल्या नोटा; घरकुलासाठी मागितली लाच

**वाशिम (प्रतिनिधी)** – काही महिन्यांपूर्वी संभाजीनगर येथील फुलंब्री पंचायत समिती कार्यालयाबाहेर एका सरपंचाने चक्क पैशांची उधळण करत विहिरी मंजूर होत नसल्याचे म्हटले होते. मंगेश साबळे यांनी हे हटके आंदोलन करुन सर्वांचेच लक्ष्य वेधले होते. आता, पुन्हा एकदा तशाच आंदोलनाची पुनरावृत्ती झाल्याचं पाहायला मिळत आहे. वाशिम जिल्ह्याच्या मालेगाव येथील पंचायत समिती कार्यालयात हा प्रकार घडला आहे.

सरकारी काम आणि ६ महिने थांब अशी म्हण आहे. शासकीय कार्यालयात पायऱ्या झिजवल्याशिवाय सर्वसामान्यांना न्याय मिळत नाही, सर्वसामान्यांची कामे होत नाहीत, अशी ओरड नेहमीच असते. अनेकदा शासकीय कार्यालयातील दफ्तर दिरंगाई हा संतापाचा आणि वादाचा मुद्दा ठरलेला आहे.

मालेगावच्या पंचायत समिती अंतर्गत येत असलेल्या ब्राम्हणवाडा गावात अनेक गरजू नागरिकांना घरकुल मंजूर झाले आहेत. मात्र, मालेगाव पंचायत समितीचे अधिकारी आणि कर्मचारी घरकुलाच्या निधीचे पैसे आणि किस्त थांबवून लाभार्थ्यांची अडवणूक करत आहेत. जाणीपूर्वक विलंब करत नागरिकांकडून पैशांची मागणी होत असल्याचा आरोपी लाभार्थ्यांनी केला आहे. विशेष म्हणजे एका संतप्त युवकाने पैशांची मागणी होत असल्याचा आरोप करत गटविकास अधिकारी यांच्या कार्यालयासमोर गावकऱ्यांसह नोटा फेकत संताप आंदोलन केलं.

यावेळी, गटविकास अधिकारी म्हणजेच 'बीडीओं'च्या अंगावरच त्याने नोटा धळल्याचे व्हिडिओतून दिसून येते. आणखी पैसे पाहिजे का? वेळोवेळी पैशांची मागणी करत घरकुलाचा हफ्ता थांबवला जातो. लाभार्थ्यांचा हफ्ता थांबवत अडवणूक करत पैसे मागणी का करता? असा सवाल लाभार्थ्यांनी उपस्थित केल्याचे पाहायला मिळाले.

# बनावट आयडी बनवणारा पोलिसांच्या जाळ्यात; ३०० महिलांची केली फसवणूक

**श्रीनगर (प्रतिनिधी)** – महिला आणि मुलींच्या नावाने इन्स्टाग्रामवर बनावट आयडी तयार करून अश्लील मेसेज पसरवणाऱ्या शुभम कुमार मनोजप्रसाद सिंग (वय २५) याला पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. हा सुरक्षा रक्षक ३०० हून अधिक महिलांना ब्लॅकमेल करत त्यांची बदनामी करत असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे.

एका महाविद्यालयीन तरुणीच्या नावाने अनेक अश्लील इन्स्टाग्राम अकाउंट्स तयार करून, त्यावर तिच्याबद्दल अश्लील संदेश आणि स्टोरीज पोस्ट केल्या जात होत्या. ही बाब तरुणीच्या निदर्शनास येताच, तिने तात्काळ दहिसर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली.संपूर्ण तीर्थयात्रा मार्ग आता 'नो फ्लाईंग झोन' म्हणून घोषित करण्यात आला आहे.

सरकारने सुरक्षेच्या कारणास्तव हा महत्वपूर्ण निर्णय घेतला आहे. केंद्रशासित प्रदेशाच्या गृह विभागाने पहलगाम आणि बालताल दोन्ही मार्गांसह अमरनाथ यात्रेचे सर्व मार्ग 'नो फ्लाईंग झोन' म्हणून घोषित केले आहेत. ही बंदी पहलगाम आणि बालताल दोन्ही मार्गांना दहिसर पोलिस ठाण्याच्या सायबर सेलचे अधिकारी सहाय्यक पोलिस निरीक्षक अंकुश दांडगे आणि त्यांच्या पथकाने या प्रकरणाचा तपास सुरू केला. त्यांनी इन्स्टाग्राम आयडीबाबत गुगल आणि फेसबुककडून माहिती मिळवली. तांत्रिक माहितीच्या आधारे, पोलिसांनी आरोपी शुभम कुमार मनोजप्रसाद सिंग याला कर्नाटकातून अटक केली.

# वसतिगृहांसाठी तातडीने जागा निश्चित करा –मंत्री सावे

**मुंबई (प्रतिनिधी)** – इतर मागास बहुजन कल्याण विभागांतर्गत ज्या जिल्ह्यांमध्ये वसतिगृहासाठी अद्याप भाडेतत्त्वावर जागा निश्चित करण्यात आलेली नाही, त्या जिल्ह्यात तातडीने योग्य जागा निश्चित करून प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांनी दिले.

मंत्री सावे यांच्या अध्यक्षतेखाली विभागाच्या १५० दिवसांच्या आराखड्याच्या अनुषंगाने बैठक घेण्यात आली. या बैठकीस इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सचिव ए. बी. धुळाज, विभागाचे संचालक ज्ञानेश्वर खिल्लारी तसेच विभागातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

१०० विद्यार्थी क्षमतेचे मुला-मुलींसाठी ५६ वसतिगृह २६ जिल्ह्यात सुरु करण्यात आली आहेत. विद्यार्थ्यांच्या कोणत्याही तक्रारी येऊ नयेत यासाठी वसतीगृहांना भेटी देऊन सर्व आवश्यक सुविधा उपलब्ध आहेत याची खात्री करावी, अशी सूचना मंत्री सावे यांनी यावेळी संबंधित अधिकाऱ्यांना दिली.


**श्री साई मागासवर्गीय मुलांचे वसतीगृह गोविंदराज सिटी किनवट**

**ता.किनवट जि. नांदेड**

**प्रवेश देणे चालु आहे**

**( सन 2025 - 2026 या वर्षा करीता )**

5 वी ते 10 वी च्या विद्यार्थ्यांना सुवर्ण संधी श्री साईबाबा शिक्षण समिती प्रसारक मंडळ जलधरा व्दारा संचलीत श्री साई मागासवर्गीय मुलांचे वसतीगृह गोविंदराज सिटी किनवट या वसतीगृहात गरजु व होतकरु विद्यार्थ्यांना सन 2025 - 2026 या शैक्षणिक वर्षासाठी जाती निहाय विहीत टक्केवारी नुसार प्रवेश देणे चालु आहे.

| अनु.जाती एस. सी. | अनु. जमाती एस. टी. | वि. जा. भ. ज. व्हि. जे. एन. टी | विशेष मागासप्रवर्ग एस. बी. सी. | | इतर मागासवर्गीय ओ. बी. सी. | बिगर मागास प्रवर्ग ( खुला ) |
|---|---|---|---|---|---|---|
| 67% | 14% | 17% | 2% | 100% | 15% | 05% |

**वसतीगृहाची वैशिष्टये**

1) प्रशस्त ईमारत
2) खेळाचे मैदान
3) मुबलक पाण्याची सोय
4) जेवनाची व रहाण्याची उत्तम व्यवस्था
5) विद्यार्थ्यांकडे व्यक्तीगत लक्ष
6) सुसज्ज ग्रंथालय
7) निसर्गरम्य वातावरण
8) नियमित अभ्यास
9) लाईटची व्यवस्था
10) दररोज योगासने व व्यायाम
11) विशेष मार्गदर्शन

**गरजु व गरीब विद्यार्थ्यांनी या सुवर्ण संधीचा आवश्य लाभ घ्यावा.**

संपर्क पत्ता

संचालक / अधिक्षक

**श्री साई मागासवर्गीय मुलांचे वसतीगृह गोविंदराज सिटी किनवट ता किनवट जि नांदेड**

**मोबाईल क्रमांक** :- 9579436465 / 8275283845



**शासनमान्य**

महाराष्ट्र शासन मान्यप्राप्त सामाजिक न्याय विभाग समाजकल्याण आयुक्तायातर्फे अनुदानित वसतिगृह

**शिक्षण विकास मंडळ नांदेड संचिलत शिक्षण विकास मुलींचे वसतिगृह दरवेश नगर नांदेड ता.जि.नांदेड**

**प्रवेश देणे चालू आहे.**

सदरील शानस मान्य अनुदानित मागासवर्गीय मुलींच्या वसतिगृहात सन २०२५-२०२६ शैक्षणिक वर्षात इयत्ता ५ वी ते १० वी वर्गात शिकत असलेल्या गरजू व होतकरू विद्यार्थीनीना जातीनिहाय टक्केवारीनुसार प्रवेश देणे चालू आहे.

| अ.क्र. | जातीचा प्रवर्ग | टक्केवारी |
|---|---|---|
| १ | अनुसुचीत जाती (एस.सी) | ६७ टक्के |
| २ | अनुसुचीत जमाती (एस.टी) | १४ टक्के |
| ३ | वि.जा./भ.ज./व्ही.जे./एन.टी | १७ टक्के |
| ४ | विशेष मागास प्रवर्ग एस.बी.सी | २ टक्के |
| | एकूण | १०० टक्के |
| ५ | इतर मागासवर्ग ओबीसी | १५ टक्के |
| ६ | बिगर मागासप्रवर्ग ओपन | ५ टक्के |

**नोट :** सुसज्ज इमारत, भोजनाची उत्तम व्यवस्था,ग्रंथालयाची सुविधा, वसतिगृहापासून जवळच अनेक शाळा,शंभर टक्के निकालाची परंपरा, अभ्यासाकडे विशेष लक्ष, पिण्यासाठी शुद्ध फिल्टर पाणी,

**टिप.एकुण मान्य संख्येच्या २० टक्के १.इतर मागासप्रवर्ग ओबीसी १५ टक्के २.बिगर मागासप्रवर्ग ओपन ५ टक्के विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जाईल.**

**अध्यक्ष** **अधीक्षीका**

**शिक्षण विकास मुलींचे वसतिगृह दरवेश नगर नांदेड ता.जि.नांदेड**

**मो.७३७८६६२८७१,९३०९९१४४९७**



**टी.सी.हरवली**

माझी अनिता दशरथ छप्पेकर रा. बिलोली ता. बिलोली जि. नांदेड या नावाची ए.एन.एम पास ची टी. सी. बिलोली ते नांदेड बस प्रवासात हरवली असून कुणाला सापडल्यास खालील क्रमांकावर संपर्क साधावा. **संपर्क पत्ता– अनिता दशरथ छप्पेकर रा.बिलोली ता.बिलोली जि.नांदेड मो. ७५८८६४३४२८**

**टी.सी.हरवली**

माझी भागवत बालाजी पौळ या नावाची, जनता हायस्कूल (क.म.वि.) नायगाव (बा) येथून काढलेली बारावी उत्तीर्ण असलेली टीसी व व आधार कार्ड वगैरे कागदपत्रे बस प्रवासात हरवली आहेत. कोणाला सापडल्यास खालील पत्त्यावर आणून द्यावेत. **संपर्क पत्ता :– भागवत बालाजी पौळ रा. पो. बनचिंचोली. ता. हदगांव जिल्हा नांदेड**

**टी.सी.हरवली**

माझी अजय प्रकाशराव बोखारे या नावाची डिप्लोमा इन इलेक्ट्रीकल इंजिनिअरिंग सेंकड ईअर समर २०१८ डिटेन ची टी.सी जालना ते नांदेड बस प्रवासात हरवली आहे. कोणास सापडल्यास खालील नंबरवर संपर्क करावे.

**–संपर्क पत्ता– राहुलनगर वाघाळा नांदेड मो.९९७५६०९९२९**



महात्मा गांधी मिशन संचलित

**ग्रंथालय व माहितीशास्त्र महाविद्यालय, नांदेड.**

एम.जी.एम. कॅम्पस, विमानतळाजवळ, नांदेड. फोन : २२२९९९.

(Affilated to S.R.T.M. University Nanded)

**प्रवेश सूचना २०२५–२६**

**खालील अभ्यासक्रमांना प्रवेश देणे सुरू आहे**

| अ.क्र. | अभ्यासक्रम | पात्रता | प्रवेश क्षमता |
|---|---|---|---|
| १. | B.Lib. & I.S. (कालावधी १ वर्ष) | B.A./B.Com./ B.Sc./B.C.A./ B.B.A | 60 |
| २. | M.Lib. & I.S. (कालावधी १ वर्ष) | B.Lib. & I.S. | २५ |

**नोकरीची संधी :** शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे, केंद्रीय विद्यालये, नवोदय विद्यालये, वृत्तपत्र कार्यालये, न्यायालये, प्रशिक्षण संस्था, आकाशवाणी, महानगरपालिका, संशोधन संस्था व तत्सम संस्थामधील ग्रंथालयात नोकरीच्या अनेक संधी उपलब्ध.

**टीप :** प्रवेश अर्ज व माहिती पत्रक कार्यालयीन वेळेत प्राप्त होईल.

**प्रा.केदार रोकडे मो.–९६२३०९७९१६,प्रा.आकाश तेलंग मो.८६०५३९९०९५**


## जाहीर प्रगटन

कृषी नगर सहाकरी गृहनिर्माण संस्था म.गोपाळचावडी ता.जि. नांदेड या संस्थंच्या कार्यकारी मंडळ व संचालक मंडळाची दिनांक ८/६/२०२५ रोजी उपनिबंधक कार्यालय नांदेड प्राधिकृत अधिकारी श्री बोधगिरे साहेब यांच्या अध्यक्षतेखाली प्रथम सर्वसाधार सभा घेण्यात येवून खालील प्रमाणे संस्थेचे कार्यकारी मंडळ व संचालक बिनविरोध निवडण्यात आले.

**कार्यकारी मंडळ**

**१.श्री.अनंत इरबाजी भदरगे–अध्यक्ष**

**२.श्री.धोंडीबा संभाजी जाधव–सचिव**

**३.श्री.हनमनलू भुमन्ना सुरकुटवार–कोषाध्यक्ष**

**संचालक मंडळ**

**१.श्री.लक्ष्मण इबाजी जोगदंड**

**२.शिवाजी श्रीधर पांचाळ**

**३.व्यंकटराव भगवानराव कुलकर्णी**

**४.विशाल जकोजी चव्हाण**

**५.गंगाराम नारायण लकडे**

वरील प्रमाणे कार्यकारी मंडळ व संचालक मंडळाची बिनविरोध निवड करण्यात आली.

**सचिव/ अध्यक्ष**

**कृषी नगर सहाकरी गृहनिर्माण संस्था म.गोपाळचावडी ता.जि.नांदेड**

## जाहीर प्रगटन

संचिका क्रमांक. ५४/४०/२०२५- २०२६/ क्षे.का.क्र.६ सिडको

प्रकरण :- नांव परिवर्तन करणे बाबत.

जाहिर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की,कोमल सुरज चौधरी रा.इतवारा नांदेड यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, गट नंबर ३५ पैकी प्लॉट नंबर १३ एकूण १२०० चौरस फुट ज्याचा मनपा मालमत्ता क्र.१०-२ पिन क्र.४०४१०००४१० आहे. श्रीमती मंजूबाई भ्र.संतोष कोलशेटवार व संकेत पि. संतोष कोलशेटवार रा.गुरूद्वारा यांच्या नावे नोंद असलेली मालमत्ता अर्जदाराने खरेदीखत/ विक्रीखत/ बक्षीसपत्र/ सोसायटी कन्व्हेसडिड व ओर्नरशीप पद्धतीचे विक्रीखत/ भाडेपत्र हस्तांतरण विक्रीखत दस्त क्र.३३९८/२०२४ दिनांक १९/३/२०२४ हस्तांतरण आदेश व सातबारा दिनांक १८/३/२०२४ अधारे प्राप्त झाली आहे.

तरी त्यांचे नावाची नोंद नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या मालमत्ता कर आकारणी नोंदवहीत घेण्यात येत आहे. तरी या सबंधात कोणी काही आक्षेप असल्यास त्यांना हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झालेल्या तारखेच्या १५ दिवसांच्याआत कार्यालयात आपला लेखी आक्षेप पुराव्यासह दाखल करावा.अन्यथा वरील अवधी संपल्यानंतर सदरील मालमत्तेवर अर्जदाराचे नावाने मालमत्ता कर आकारणी नोंदवहीत सदरील नावाची नोंद घेण्यात येईल.**चर्तुसिमा-पुर्वेस-प्लॉट नंबर १४,पश्चिमेस-प्लॉट नंबर १२, दक्षिणेस-चन्नावार यांची जमिन,उत्तरेस-२० फुट रूंद रस्ता**

**क्षेत्रिय अधिकारी**

**क्षेत्रिय कार्यालय क्र.६ सिकडो**

**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका**

## जाहीर प्रगटन

संचिका क्रमांक. १६३/४०/२०२५- २०२६/ क्षे.का.क्र.१ तरोडा सांगवी

प्रकरण :- नांव परिवर्तन करणे बाबत.

जाहिर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, सौ.ज्योती भगवान गिरी रा.तरोडा खूर्द नांदेड यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की,तानिभूअ पत्र क्र.१०५१/९ दिनांक ३०/१०/२००९ तरोडा खुर्द गट नंबर १३० पैकी प्लॉट नंबर ४१ व ५० वरील सदनिका क्र.३०१ पिन क्र.४०१०३०७४०२४ आहे. नागोराव बापूराव सांळूके व इतर यांच्या नावे नोंद असलेली मालमत्ता यांचेकडून अर्ज खरेदी खत क्र.९१३१ दिनांक २६/१२/२०२४ च्या अधारे विकत घेतली आहे/ वारसाहक्क प्राप्त झाली आहे.

तरी त्यांचे नावाची नोंद नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या मालमत्ता कर आकारणी नोंदवहीत घेण्यात येत आहे. तरी या सबंधात कोणी काही आक्षेप असल्यास त्यांना हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झालेल्या तारखेच्या १५ दिवसांच्याआत कार्यालयात आपला लेखी आक्षेप पुराव्यासह दाखल करावा.अन्यथा वरील अवधी संपल्यानंतर सदरील मालमत्तेवर अर्जदाराचे नावाने मालमत्ता कर आकारणी नोंदवहीत सदरील नावाची नोंद घेण्यात येईल.

**चर्तुसिमा-पुर्वेस-सनिक क्र.३०४,पश्चिमेस-सदनिक नंबर ३०२, दक्षिणेस-ओपन स्पेस,उत्तरेस-सदनिका नंबर ३०२**

**क्षेत्रिय अधिकारी**

**क्षेत्रिय कार्यालय क्र.१ तरोडा- सांगवी**

**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका**

## Change In Name

My old Name is REYASH MANISH MAKAN which now I am Changing as New Name RIYASH MANISH MAKAN Hence forth My All Correspondence will be done as per my new name. Please consider the same, SIGN BY-RIYASH MANISH MAKAN

ADD-FLATNOBARRIYATOWERSDASMESH NAGAR NEAR KHAISA HIGH SCHOOL BAFNA NANDED 431601 MO.8208679942


**कुत्रीचे पिल्ले विकणे आहे**


डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.

संपर्क गोपालअण्णा

डॉग डिलर

मोबाईल नंबर

९८५०६८८५२८



स्थलांतर
सिटी मॅक्स डिजिटल कलर
मो.7058766021,9422185282
गट्टम मार्केट, पहिला मजला,
शिवाजी नगर, नांदेड

गोदातीर समाचार

पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस
हर्बल ट्रिटमेंट
१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.
पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308



# कृषि कार्यालयाचे भरारी पथकं सज्ज

## खते-बियाणे, किटकनाशके निविष्ठा केंद्रांची तपासणी होणार

**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्ह्यात खरीप हंगाम तोंडावर आला आहे. शेतकऱ्यांना उत्कृष्ट बियाणे, खते व किटकनाशके मिळण्यासाठी बाजारात उपलब्ध होणाऱ्या बियाणे, खते व किटकनाशक विक्रेते व उत्पादक यांच्या नियमित तपासण्या करण्यात येणार आहेत. त्यासाठी नांदेड जिल्हयामध्ये जिल्हास्तरावर एक व प्रत्येक तालुकास्तरावर १६ असे एकुण १७ भरारी पथकांची स्थापना करण्यात आली आहे. निविष्ठा खरेदी करतांना काही अडचणी येत असतील किंवा विक्रेत्यांकडून अडवणुक होत असेल तर तात्काळ संबंधित तालुका कृषि अधिकारी किंवा कृषि अधिकारी, पंचायत समिती यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी डी. आर. कळसाईत यांनी केले आहे.

खरीप हंगामामध्ये कृषिसेवा केंद्रचालक किंवा खाजगी एजंटामार्फत शेतकऱ्यांना निकृष्ट दर्जाचे खते बियाणे व किटकनाशके शेतकऱ्यांना विक्री करण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यासाठी कृषि विभागाकडुन कृषि सेवा केंद्राची नियमित तपासणी करण्यात येत असते. सर्व निविष्ठांचे व्यवस्थित वाटप व चांगल्या प्रतीच्या निविष्ठा शेतकऱ्यांना मिळतील, शेतकऱ्यांची निविष्ठासाठी अडवणुक होणार नाही यासाठी भरारी पथक काम करणार आहे. त्याचबरोबर कृषि निविष्ठा विक्रीमध्ये गैरव्यवहार, साठेबाजी, ज्यादा दराने विक्री असे गैरप्रकार निदर्शनास आल्यास उत्पादक, विक्रेत्यांचे परवाने निलंबित किंवा रद्य करण्यात येतील. तसेच गैरव्यवहाराचे स्वरुप गंभीर असल्याचे निदर्शनास आल्यास किंवा बोगस बियाणे, खते व किटकनाशकांची विक्री केल्यास संबंधिताविरुध्द भरारी पथकामार्फत फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येणार आहेत.

तालुकास्तरावर भरारी पथकामध्ये तालुका कृषि अधिकारी, कृषि अधिकारी पंचायत समिती, निरीक्षक वजन व मापे व मंडळ कृषि अधिकारी यांचा समावेश करण्यात आला आहे. तसेच जिल्हास्तरीय भरारी पथकात कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद नांदेड, मोहिम अधिकारी, जिल्हा परिषद नांदेड, उपविभागीय कृषि अधिकारी, जिल्हा गुणनियंत्रण निरीक्षक, वजन मापे निरीक्षक यांचा समावेश करण्यात आला आहे.

मागील वर्षात कृषि विभागामार्फत नांदेड जिल्ह्यात बोगस खते विक्री केल्यामुळे फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आले आहे. अप्रमाणीत बियाण्यांची विक्री केल्यामुळे उत्पादक व कृषि सेवा केंद्रचालक यांच्या विरुध्द ३२ न्यायालयीन खटले दाखल करण्यात आले आहेत. चालू खरीप हंगामामध्ये मोहीम राबवून रॅंडमली कृषि निविष्ठा विक्रेते व उत्पादकांच्या तपासण्या करण्यात येणार आहेत. त्यामध्ये अनियमितता आढळुन आल्यास संबंधितांचा परवाना निलंबित अथवा रद्य करण्यात येईल. त्यामुळे कोणत्याही निविष्ठा विक्रेत्यांनी गैरव्यवहार, साठेबाजी, ज्यादा दराने विक्री, बोगस खते बियाणे विक्री करु नये, असे निदर्शनास आल्यास संबंधिताविरुध्द कायदेशीर कडक कार्यवाही करण्यात येणार आहे, असे जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी डी. आर. कळसाईत यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे.

# बाळासाहेब ठाकरे हळद संशोधन केंद्रासाठी लवकरच मनुष्यबळ पुरविण्यात येणार –ना. हेमंत पाटील

**नांदेड (प्रतिनिधी)–** हळद संशोधन केंद्रासाठी लवकरच मोठ्या प्रमाणात मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यात येणार आहे, अशी माहिती नामदार हेमंत पाटील यांनी दिली आहे. बाळासाहेब ठाकरे हळद संशोधन व प्रशिक्षण केंद्राची आढावा बैठक राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.



या बैठकीला नामदार हेमंत पाटील यांच्यासह कृषी, फलोत्पादन, वित्त विभागाचे अधिकारी संशोधन केंद्राचे व्यवस्थापकीय संचालक राजेंद्र कदम लेखाधिकारी बी.एम सोलेवाड, शिवाजी शितोळे आदी उपस्थित होते.

हळद संशोधन केंद्राच्या आजवरच्या कार्याचा आढावा घेण्यासाठी ही आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती.सद्य स्थितीत हळद संशोधन केंद्राच्या वसमत येथील प्रक्षेत्रावर ईमारत, प्रयोगशाळा बांधकाम सुरू आहे. तसेच हिंगोली, नांदेड, परभणी, यवतमाळ जिल्ह्यातील शेतकऱ्यांना नवनवीन जातीचे हळद बेणे उपलब्ध व्हावेत यासाठी लागवड करून विक्री करण्यात येत आहे. उत्तम प्रतीचे बेणे शेतकऱ्यांना देऊन हळदीचे लागवडक्षेत्र वाढविण्यासाठी संशोधन केंद्राचे अधिकारी, कर्मचारी कार्यरत आहेत.

शेतकरी मेळावे, आणि प्रदर्शनाच्या माध्यमातून शेतकऱ्यांशी संवाद साधून त्यांच्या अडीअडचणी व समस्या जाणून सोडवल्या जात आहेत.

नुकतीच राज्यमंत्री जयस्वाल यांनी संशोधन केंद्राच्या प्रक्षेत्रास भेट देऊन संपूर्ण कामाची पाहणी केली होती. त्यानंतर आता आढावा बैठक घेऊन मनुष्यबळ उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला. या यावेळी बैठकीत पुढील काळात संशोधन केंद्राच्या माध्यमातून करण्यात येणारे कार्य याचा आढावा घेऊन शेतकरी हिताच्या दृष्टीने काय काय उपाययोजना करण्यात येणार आहेत, याचा आढावा घेतला. तसेच प्रक्षेत्राच्या कामासाठी शासनाकडून वेळोवेळी वितरित करण्यात येणारा निधी यावर सुद्धा चर्चा झाली.

# २१ जून रोजी आंतरराष्ट्रीय योग दिन मोठ्या प्रमाणात साजरा करा –जिल्हाधिकारी कर्डिले

### ११ वा आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यासाठी नोंदणी करण्याचे आवाहन



**नांदेड (प्रतिनिधी)–** दरवर्षी २१ जून रोजी जगभरात 'आंतरराष्ट्रीय योग दिन' उत्साहाने साजरा करण्यात येतो. यावर्षीच्या ११ व्या आंतरराष्ट्रीय योग दिनाची संकल्पना ही 'एक पृथ्वी एक आरोग्य' साठी योग ही असून केंद्र शासनाने योगदिनाचा कार्यक्रम सर्व स्तरांवर मोठ्या उत्साहात साजरा करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार २१ जून रोजी आंतरराष्ट्रीय योग दिन मोठया प्रमाणात साजरा करा, असे आवाहन जिल्हाधिकारी कर्डिले यांनी केले आहे.

योगशास्त्र ही भारतीयांची जगाला दिलेली देणगी आहे. योगाने उच्च रक्तदाब, मधुमेह, थायरॉईड वृद्धी, मनोविकार, सांध्यांचे विकार तसेच दैनंदिन जीवनशैलीमुळे निर्माण झालेले आजार कमी होऊ शकतात. दैनंदिन जीवनात योग आत्मसात केल्याने शरीर निरोगी राहण्यास मदत होते तसेच सकारात्मक ऊर्जा कायम राहते.

यास अनुसरून जिल्ह्यातील सर्व शासकीय व निमशासकीय संस्थांमध्ये सर्व जिल्हा परिषद शाळा, सर्व खाजगी व अनुदानित शाळांमध्ये आंतरराष्ट्रीय योग दिन मोठ्या प्रमाणात साजरा करण्यात यावा. यासाठी शासकीय-अशासकीय संस्था, स्वयंसेवी संस्था, लोकप्रतिनिधी, इतर विभागातील अधिकारी-कर्मचारी व सामान्य नागरिक यांचा सक्रिय सहभाग घ्यावा व योगविषयक जागरूकता निर्माण करण्यासाठी सोबत दिलेल्या उपक्रमांचा अंतर्भाव करून त्यासंबंधीचा प्रचार करण्यासाठी विविध ऑनलाइन संसाधनांचा वापर करावा. यातील योग संगम या २१ जून २०२५ रोजीच्या योगसत्र कार्यक्रमाची नोंद केंद्रीय आयुष मंत्रालयाच्या अधिकृत पोर्टल https://yoga.ayush.gov.in/yoga-sangam वर तात्काळ रजिस्ट्रेशन करुन सदरचा स्क्रिनशॉट संबंधित व्हॉटसॲप ग्रुपवर टाकण्यात यावेत. दिनांक २१ जून रोजी सकाळी ७ ते ७.४५ वाजे दरम्यान कॉमन योग प्रोटोकॉल (सीवायपी) नुसार योग प्रात्यक्षिके करावीत व पुढील १५ मिनिटे इतर योगाभ्यास करावा.

CYP लिंक https://www.youtube.com/watch? v=X8zQmuWEpSUlist=PLxZ05kgQiFwf6JbbEvThly9-cZ0xrfxvkindex=3 कार्यक्रमात योग संबंधित माहिती साहित्य, बॅनर्स, कटआउटस इत्यादीचा योग्य वापर करावा. कार्यक्रम मोठ्या प्रमाणात साजरा करून त्यास समाज माध्यमे व वृत्तपत्रांतून प्रसिद्धी देण्यात यावी. तसेच फोटो, बातम्यांचे संकलन व संख्या अहवाल दिलेल्या प्रपत्राप्रमाणे भरून https://yoga.ayush.gov.in/yoga-sangam या पोर्टलवर पाठवावेत, असे निर्देश जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी संबंधित कार्यालयांना दिले आहेत.

# वंदे भारत एक्सप्रेस नांदेडपर्यंत आणल्याच्या निर्णयाचे शीख भाविकांकडून स्वागत

### डॉ. विजय सतबीरसिंघ यांनी मानले आभार

**नांदेड (प्रतिनिधी)–** वंदे भारत एक्सप्रेस नांदेडपर्यंत विस्तार करून महाराष्ट्रातील शीख समुदायाला एक मोठी भेट मिळाली आहे. या वंदे भारत एक्सप्रेस ट्रेनमुळे शीख समुदायामध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे, अशी प्रतिक्रिया गुरुद्वारा बोर्डाचे प्रशासक डॉ. विजय सतबीरसिंघ यांनी दिली आहे.



डॉ. विजय सतबीरसिंघ म्हणाले की, वंदे भारत ट्रेन नांदेडपर्यंत आणण्यात यावी, यासाठी शीख समाजातून मागणी होत होती. पंतप्रधान नरेंद्र मोदी, रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव, रेल्वे राज्य मंत्री स. रवनीत सिंघ बिट्टू व महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ती पूर्ण केली आहे. महाराष्ट्र आणि संपूर्ण भारतातील शीख समुदायासाठी हा खूप अभिमानाचा आणि आनंदाची बाब आहे. वंदे भारत ट्रेनमुळे तख्त सचखंड श्री हजुर साहिबच्या दर्शनासाठी भाविकांची वेळ वाचणार असून प्रवासही आरामदायी होणार आहे. वंदे भारत ट्रेन (२०७०५) नांदेडहून दररोज सकाळी ५ वाजता निघेल आणि दुपारी २.२५ वाजता मुंबईला पोहोचेल. तर मुंबईहून ही ट्रेन (२०७०६) दुपारी १.१० वाजता निघेल आणि रात्री १०.५० वाजता नांदेडला पोहोचणार आहे, असेही त्यांनी सांगितले.

# एक लाख रुपयांची बॅग लिफ्टिंग

**नांदेड (प्रतिनिधी) –** बिलोली येथील बसस्थानकातून एक लाख रुपये असलेली बॅग चोरट्यांनी हातोहात लांबविली. ही घटना मंगळवारी दि. १७ रोजी दुपारी एकच्या सुमारास घडली. या प्रकरणी बिलोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आरळी येथील गंगाधर मल्लाप्पा आवुळके (वय ५५ वर्ष) यांनी १७ जून रोजी दुपारी एक वाजता बिलोली येथील त्यांच्या बँक खात्यातून एक लाख ४८ रुपये काढले. त्यातील चाळीस हजार रुपये त्यांच्या पत्नीला दिले आणि बिलोली बसस्थानकावर सोडून एक लाख आठ हजार रुपयाची पिशवी आपल्या दुचाकीवर ठेवून बिलारी तालुका मुधोळ जिल्हा निजामाबादकडे निघाले. दरम्यान त्यांना एक फोन आल्याने ते बोलत थांबले. यावेळी एका दुचाकीवरून आलेल्या अनोळखी दोन चोरट्यांनी काका तुमचे मतदान कार्ड खाली पडले असे म्हणून त्यांची नजर चुकवली आणि त्यांच्या समोर असलेली एक लाख आठ हजार रुपये किमतीची बॅग लंपास केली. गंगाधर आवुळके यांच्या फिर्यादीवरून बिलोली पोलीस ठाण्यात अनोळखी दुचाकीविरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक कमल शिंदे करत आहेत.

# नागोराव पाटील मुसळे यांचे निधन

**अर्धापूर (प्रतिनिधी)–** आंबेगाव येथील सेवा सहकारी सोसायटीचे माजी चेअरमन नागोराव बाबाराव पाटील मुसळे यांचे बुधवारी (दि.१८) सायंकाळी निधन झाले.



नागोराव पाटील मुसळे यांच्यावर दि.१९ रोजी दुपारी १ वाजता आंबेगाव येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. नागोराव पाटील मुसळे यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे. भारत पाटील मुसळे यांचे ते वडील होत.

# स्वस्त धान्य दुकानदारांचे सहा महिन्यांपासून कमिशन रखडले

**किनवट (प्रतिनिधी)–** तालुक्यातील स्वस्त धान्य दुकानदार गेली सहा महिने कमिशनपासून वंचित आहेत. कमिशन न दिल्याने खर्च कसा भागवायचा, असा प्रश्न दुकानदार उपस्थित करत आहेत. संघटनेच्या वतीने सातत्याने शासनदरबारी पत्रव्यवहार केला जात आहे. मात्र सकारात्मक निर्णय घेतला जात नाही.

तालुक्यातील २०१ स्वस्त धान्य दुकानदारांमार्फत धान्य वाटप केले जाते. सार्वजनिक अन्नधान्य वितरण व्यवस्थेत नागरिकांना राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेतून धान्यपुरवठा केला जात आहे. या योजनेतून स्वस्त धान्य दुकानदारांना दीडशे रुपये प्रतीक्विंटल कमिशन प्राप्त होते. सुरुवातीला दर तीन महिने कमिशन दिले जात होते. काही काळानंतर यात खंड पडला. त्यामुळे कमिशनसाठी रेशन दुकानदारांना चार ते सहा महिने वाट पाहावी लागत आहे.

तालुक्यातील दुकानदारांचे जानेवारीपासूनचे कमिशन मिळाले नाही. धान्य वाटपाचे शंभर टक्के लक्ष पूर्ण करण्याचे उद्दिष्ट धान्य दुकानदारांना देण्यात येते. मात्र, याच दुकानदारांचे कमिशन रखडले आहे. कमिशन न मिळाल्यास खर्च कसा भागवायचा, वीजबिल व इतर खर्चाची चिंता दुकानदारांना



आहे. शासनाने सकारात्मक लक्ष देण्याची मागणी होत आहे.

> कमिशन रखडल्याने स्वस्त धान्य दुकानदार आर्थिक अडचणीत आहेत. त्यांना उत्पन्नाचे दुसरे साधन नसल्याने उपजीविका चालविणे अवघड होत आहे. राज्य सरकारसोबत झालेल्या बैठकीतील निर्णयावर कार्यवाही केली जात नसल्याचा फटका रेशनिंग दुकानदारांना बसत आहे.
>
> **–मिलिंद सर्पे,**
> महासचिव, रेशन व केरोसीन दुकानदार महामंडळ, जि. नांदेड

# नोंदणी व मुद्रांक विभागातील शिपाई पदांसाठी १ ते ८ जुलै दरम्यान ऑनलाईन परीक्षा

**नांदेड (प्रतिनिधी)–** नोंदणी व मुद्रांक विभागात शिपाई 'गट-ड' संवर्गात २८४ पदे भरती करीता पात्र उमेदवारांची परीक्षा १ ते ८ जुलै २०२५ या कालावधीत ऑनलाईन पद्धतीने घेण्यात येणार असल्याची माहिती नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक रवींद्र बिनवडे यांनी दिली आहे.

नोंदणी व मुद्रांक विभागातील ही भरती प्रक्रिया पूर्ण करण्याकरिता ऑनलाईन पद्धतीने अर्ज स्वीकारण्यासाठी तसेच ऑनलाईन पद्धतीने परीक्षेचे आयोजन करण्यासाठी आयबीपीएस (इन्स्टिट्यूट ऑफ बँकींग पर्सोनेल सिलेक्शन) कंपनीस नियुक्त केले असून आयबीपीएस कडून दि. २२ एप्रिल ते १६ मे २०२५ दरम्यान ऑनलाईनपद्धतीने अर्ज भरुन घेण्यात आलेले आहेत. आयबीपीएसच्या संकेतस्थळावर यशस्वीरित्या भरलेले अर्ज व पात्र असलेल्या उमेदवारांची परीक्षा दि. १ ते ८ जुलै २०२५ या कालावधीत ऑनलाईन पद्धतीने घेण्यात येणार आहे. परीक्षेचे प्रवेशपत्र / हॉलतिकीट उमेदवारास त्यांनी नोंदणी केलेल्या ई-मेलवर आयबीपीएस कडून पाठविण्यात येणार आहेत. या परीक्षेकरीता विभागाकडून कोणत्याही इतर एजन्सीची वा मध्यस्थाची नेमणूक करण्यात आलेली नाही. जर याबाबत कोणती व्यक्ती, संस्था, मध्यस्थ अथवा इतरांकडून तशी बतावणी करण्यात येत असल्यास अशा व्यक्ती वा संस्थेपासून उमेदवारांनी सावध राहावे, असे आवाहन नोंदणी व मुद्रांक विभागातर्फे करण्यात आले आहे.

# नित्य योग सेवा समितीच्यावतीने योगिक बाईक रॅलीचे आयोजन

**नांदेड (प्रतिनिधी)–** जगभर साजरा होणाऱ्या आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या पार्श्वभूमीवर नांदेड येथील नित्य योग समिती, भक्ती लॉन्सच्या वतीने २१ जून रोजी शहरात भव्य बाईक रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे.

२१ जून रोजी नित्य योग समिती शाखा भक्ती लॉन्स च्या वतीने भव्य असा आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात येत आहे. या योग दिनाला महाराष्ट्र राज्याच्या आरोग्य राज्यमंत्री मेघना साकोरे (बोर्डीकर), नांदेड परीक्षेत्राचे पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप हे विशेष अतिथी म्हणून उपस्थित राहणार असून नांदेड महापालिकेचे आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन होणार आहे. तर अध्यक्षस्थानी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांची उपस्थिती राहणार आहे.

नांदेड उत्तर विधानसभेचे आमदार बालाजीराव कल्याणकर, शिवालय प्रतिष्ठानच्या अध्यक्षा संध्याताई कल्याणकर, पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली आदिची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती राहणार आहे.

या कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर दि. २० जून रोजी भक्ती लॉन्स येथून सकाळी ६:३० वाजता शेकडो महिला व पुरुष योगिक साधकांच्या सहभागासह बाईक रॅली निघणार असून ती तरोडा नाका, शेतकरी चौक, वर्कशॉप कॉर्नर, भाग्यनगर, आनंदनगर मार्गे साठे चौक, चिखलवाडी कॉर्नर, वजिराबाद, पोलीस अधीक्षक कार्यालय मार्गे कलामंदिर, शिवाजीनगर, आयटीआय कॉर्नर, श्रीनगर मार्गे परत शेतकरी चौकापासून भक्ती लॉन्सकडे विसर्जित होणार आहे. नागरिकांमध्ये योगाची संकल्पना रुजावी, संपूर्ण योगाचा शहरभर प्रचार प्रसार व्हावा आणि २१ जूनच्या आंतरराष्ट्रीय योग दिनात नागरिकांचा सहभाग वाढावा या मुख्य उद्देशाने या रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे.

या रॅलीत भक्ती लॉन्स व्यतिरिक्त इतरही लोकांनी सहभाग नोंदवावा, असे आवाहन योगाचार्य सिताराम सोनटक्के यांनी केले आहे.

# 'गुरूकुल'च्या १५० विद्यार्थ्यांचे इंदिरा इंटरनॅशनल स्कूलमध्ये समायोजन

**नांदेड (प्रतिनिधी)–** गुरुकुल पब्लिक स्कूल बंद झाल्याने शिक्षणापासून वंचित झालेल्या धनगर समाजाच्या १५० विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा प्रश्न गंभीर बनला होता. मात्र, विद्यार्थी व पालकांच्या सातत्यपूर्ण संघर्षाला आणि समाजबांधवांच्या एकजुटीला अखेर यश मिळाले. १५० विद्यार्थ्यांचे इंदिरा इंटरनॅशनल स्कूलमध्ये समायोजन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

या सकारात्मक निर्णयामागे ओबीसी बहुजन पक्षाचे जिल्हाध्यक्ष महेंद्र देमगुंडे, बालासाहेब गडदे, कुबीरराव भुतनर, बळवंत कोकरे, अशोक लाकडे, मारोती चितळे, विठ्ठल हाके, आणि सहाय्यक आयुक्त समाजकल्याण अधिकारी शिवानंद मिनगिरे यांची भूमिका मोलाची ठरली. संबंधित पदाधिकाऱ्यांशी चर्चा करून इंदिरा इंटरनॅशनल स्कूलचा पर्याय समोर ठेवण्यात आला.

पालकांनी रात्री ९.३० वाजता शाळेची पाहणी करून याबाबत समाधान व्यक्त केले आणि विद्यार्थ्यांचे तेथे समायोजन करण्यासाठी सहमती दर्शविली. त्यानंतर अधिकाऱ्यांनी ४ दिवसांत सर्व विद्यार्थ्यांचे प्रवेश पूर्ण करण्यात येतील असे लेखी पत्र देऊन विश्वास दिला. त्यामुळे गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेले आंदोलन रात्री १० वाजता शांततेत मागे घेण्यात आले.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com